लोकावती :

# जगाला प्रेम अर्पावे

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय कथा
दा. क्र. 27-58



BVBK-0402479

বাবা
২১৮৫
৭৭৫

প. ব. স. মু., গ্রন্থাগার
বাংলা বিভাগ দিনাংক ৭/৫/৯০
গ্র. স. ২১৮৫
বিষয় বাবা

# जगाला प्रेम अर्पावे

लीलावती भागवत

मूल्य पंधरा रुपये

BVBK-0402479

उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४

प्रकाशक :
सौ. सविता जोशी
उत्कर्ष प्रकाशन
रेणुका अपार्टमेंट
पुणे ४११ ००४

---

मुखपृष्ठ व आतील चित्रे :
वसंत सहस्त्रबुद्धे

मुद्रक :
गिरीश जोशी
श्रीपाद ऑफसेट
१९४/२ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

मूल्य - १५ रुपये

प्रथम आवृत्ती :
११ जून १९८२

द्वितीय आवृत्ती :
गुढीपाडवा, ६ एप्रिल १९८९

# निवेदन

'खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावे' ही सर्वव्यापी अशा खऱ्या धर्माची अत्यंत मौलिक व्याख्या पूज्य गुरुजींनी आपल्या 'खरा धर्म' या अमर काव्यात केली आहे. साने गुरुजी कथामाला हे गुरुजींच्या अनेक स्मारकांपैकी एक स्मारक १९५१ साली गुरुजींच्या जन्मदिनी सुरू झाले.

कथामालेने 'खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावे' हे आपले ध्येयगीत ठरविले व 'करी मनोरंजन जो मुलांचे । जडेल नाते प्रभुशी तयाचे' ही आपली निष्ठा मानली.

साने गुरुजी कथामालांच्या सर्व केंद्रांवर 'खरा धर्म' या समूहगीताने कार्यक्रमाचा प्रारंभ होत असतो. साने गुरुजींबद्दल नितांत आदर बाळगणारे व मुलांचे लाडके संगीत दिग्दर्शक श्री. वसंतराव देसाई यांनी या गीताला अत्यंत सुरेल व भावपूर्ण चाल दिली व त्याबरहुकूम सर्वत्र हे गीत गायिले जाते.

या ध्येयगीतात साने गुरुजींनी खऱ्या मानव्याला पोषक अशा विचारांची अत्यंत सोप्या भाषेत गुंफण केली आहे.

माथेरान येथे पंधरा-वीस वर्षांपूर्वी कथामालेतर्फे कथानिवेदकांचे एक शिबिर आयोजित केले होते. त्या शिबिराला सौ. मालतीबाई बेडेकर, सौ. कृष्णाबाई मोटे, श्री. भा. रा. भागवत, सौ. लीलावती

भागवत, श्री. शिरूभाऊ लिमये, श्री. यदुनाथ थत्ते, श्री. राजाभाऊ मंगळवेढेकर आदि अधिकारी व्यक्तींनी मार्गदर्शन केले. त्या वेळी लीलावती भागवत यांनी आपल्या भाषणात पूज्य साने गुरुजींनी 'खरा तो एकची धर्म' या काव्यातील प्रत्येक कडव्यात जे मौलिक असे मानवतावादी विचार मांडले आहेत त्या प्रत्येक विचारावर एकेक कथा लिहून त्यांचे जर मुलांच्यासमोर निवेदन झाले तर संस्काराचे दृष्टीने उपयुक्त कार्य होईल असे विचार मांडले. त्याच वेळी खाजगीत लीलाबाईंनीच ही जबाबदारी स्वीकारावी अशी मी त्यांना विनंती केली व त्यांनीही ती आनंदाने मान्य केली. तथापि त्यांचे अनेक व्याप व सर्वांचीच कामाची धांदल यामुळे तो विचार गेली वीस वर्षे कृतीत येऊ शकला नाही.

चार महिन्यांपूर्वी आदरणीय मामा क्षीरसागर यांच्या चरित्राच्या जुळणीनिमित्त लीलाताईंची व माझी मुंबईला भेट झाली. मागची आठवण होतीच. लीलाताईंना त्याचे स्मरण करून दिले आणि त्यांनी तितक्याच तत्परतेने 'जगाला प्रेम अर्पावे' या कथा लिहून देण्याचे आश्वासन दिले व प्रत्यक्ष लिखाणास आरंभही केला.

"या कथा लिहीत असताना मी एक निराळाच आनंद अनुभवीत आहे. त्याचबरोबर साने गुरुजींसारख्या असामान्य व्यक्तीच्या गीतावर आधारून काही लिहायचे म्हणजे केवढी जबाबदारी आहे याचीही जाणीव असल्याने ते कार्य पूर्ण झाल्यावर मला मनस्वी समाधान वाटले" अशा आशयाचे लीलाताईंचे मला काही दिवसांपूर्वी जेव्हा पत्र आले, तेव्हा त्यांच्याबद्दलचा माझ्या ठिकाणी असलेला आदर द्विगुणित झाला.

# बरं का मुलांनो....

तुम्ही लहानपणी साने गुरुजींच्या गोड गोष्टी वाचल्या असतील. नंतर नंतर **श्याम, धडपडणारी मुले, सुंदर पत्रे, श्यामची आई,** ही पुस्तकं वाचण्यात तुम्ही रंगून गेला असाल. **श्यामची आई** चित्रपट बघताना तुम्ही अस्वस्थ होऊन विचार करू लागला असाल.

गुरुजींच्या कविताही अशाच गुंगवून टाकणाऱ्या आणि अस्वस्थ करणाऱ्या आहेत. तुम्ही त्या वाचल्या आहेत का? नसल्या वाचल्या तर त्यांचा **पत्री** कवितासंग्रह मिळवा आणि एकदा वाचून तर पाहा.

**हस रे माझ्या मुला** म्हणून प्रेमळपणे सांगणारे, निसर्गाशी जवळचं नातं या कवितेत जोडणारे साने गुरुजी शेतकऱ्यांवर अन्याय होतो आहे हे बघितल्याबरोबर मात्र खवळून उठतात आणि

**आता उठवू सारे रान**
**आता पेटवू सारे रान**

म्हणून गगनभेदी घोषणा देतात.

न्याय मिळाला पाहिजे, हा जसा साने गुरुजींचा आग्रह होता त्याचप्रमाणे माणसाने काहीतरी प्रत्यक्ष कार्य केलं पाहिजे असं त्यांचं ठाम मत होतं. राष्ट्रउभारणीच्या कार्यात प्रत्येकाने आपला

वाटा उचलला पाहिजे असं ते सांगत. काम करण्यावर त्यांची श्रद्धा होती. म्हणूनच एका कवितेत ते म्हणतात –

**आम्ही देवाचे मजूर**
**आम्ही देशाचे मजूर**
**आम्ही कष्ट करू भरपूर**
**आम्ही यत्न करू भरपूर**
**आम्ही देवाचे मजूर--**

अशा वेगवेगळ्या भावनांनी ओथंबलेल्या त्यांच्या कवितांमधली मला सर्वांत आवडणारी कविता म्हणजे

**खरा तो एकची धर्म**
**जगाला प्रेम अर्पावे ।**

या कवितेत त्यांनी आपल्याला खूप काही सांगितलं आहे; पण ते नुसतं ऐकून मनात साठवण्यापुरतंच नाही, तर प्रत्यक्ष कृतीने करून दाखवायला.

आता यात सांगितलेलं प्रत्यक्ष कृतीत उतरवायचं म्हणजे काय काय करायचं ?

बरेच दिवस मी याचा विचार करीत होते.

**भरावा मोद विश्वात** – ठीक आहे. पण 'मोद भरायचा' म्हणजे नेमकं काय करायचं ?

**सदा जे आर्त अति विकल**
**तयां जाऊन हसवावे ।**

कबूल आहे. पण हसवायचं म्हणजे त्यांचं दुःख तर आधी दूर करायला हवं ! की दुःख दूर करणं म्हणजेच हसवणं ?

अकरा कडव्यांच्या या कवितेत प्रत्येक कडव्यामध्ये काहीतरी करावं असं गुरुजींनी आपल्याला सांगितलं आहे. लहान मुलं, मोठी माणसं या सगळ्यांनाच ते असं सांगतात.

मग मी या कवितेवर विचार करीत राहिले. आणि मला माझ्या कल्पनेत काही मुलं दिसायला लागली. त्यांनी त्यांच्या दृष्टीने या कडव्यांचा अर्थ लावला आणि त्याप्रमाणे प्रत्यक्ष काही तरी करून दाखवलं.

तुमच्याचएवढी, तुमच्यासारखी या कथांमधली ही साधीसुधी मुलं. त्यांना जर या कडव्यांचा त्यांच्या परीने अर्थ लागू शकला तर तुम्हाला का लागणार नाही ? तुम्ही म्हणाल, 'तुमच्या या कथांमधल्या कल्पनेतल्या मुलांना तुम्ही तुमच्या मनातला अर्थ लावून दिलात.'

कबूल. पण कल्पनेतली मुलं काही करायला लागली आणि ते खरंखुरं होऊ शकतं असं मला जाणवायला लागलं. तुम्हाला हाच अर्थ कदाचित आवडेल, कदाचित तुम्ही वेगळा अर्थ लावून त्याच्या योग्य असं वेगळं काही कराल. तुम्ही मित्रमंडळी गटागटाने एकाच अर्थाप्रमाणे कराल. कदाचित तुमच्यापैकी प्रत्येकाला त्या कडव्यांचा वेगवेगळा अर्थ जाणवेल. मग तर फारच चांगलं की ! जितके जास्त अर्थ, जितक्या वेगवेगळ्या कल्पना, तितकी वेग-वेगळ्या क्षेत्रात वेगवेगळी कामं !

साने गुरुजींना तरी यापेक्षा जास्त काय हवं होतं ?

तेव्हा आता हे पुस्तक वाचलंत की तुम्ही विचार करायला लागणारच आहात. कधी याच कथेतल्या मुलांच्याही भूमिका तुम्ही

करणार आहात. कारण माझी खात्री आहे, ही कविताच अशी मोहून टाकून विचाराचा आणि कृतीचा मंत्र शिकवणारी आहे.

साने गुरुजींनी कविता लिहिली खूप वर्षांपूर्वी, पण अजूनही ती आहेच की नाही सर्वांच्या डोळ्यांसमोर ?

आता तुम्ही तुमच्या या लहान वयात काही कराल, मग मोठे व्हाल, मोठेपणी तुम्हाला त्याचा एकादा वेगळा पैलू आढळेल. मग तुम्ही त्याचा पाठपुरावा कराल.

म्हणजे काय ? कविता जशी संपणार नाही तसेच तुमचे विचार आणि कामही संपणार नाहीत.

'धर्म म्हणजे कर्तव्य' ही व्याख्या तुम्ही ऐकली, वाचली असेल. अशा या धर्माला, कर्तव्याला दाही दिशा जग मोकळं आहे. म्हणूनच तर कुठल्याही कृत्रिम, संकुचित भेदाभेदांमध्ये अडकून न पडता सगळं जगच आपलं मानून त्यावर प्रेम करावं असं गुरुजी सांगतात. कवितेच्या शेवटी त्यांनी तेच सांगितलं आहे.

**जयाला धर्म तो प्यारा**
**तयाने प्रेममय व्हावे ।**

गोष्टीच्या प्रारंभी मुद्दामच तुमच्यासाठी ही संपूर्ण कविता छापली आहे. त्यातल्या सगळ्याच्या सगळ्या कल्पना आमच्या कथेतल्या मुलांनी घेतलेल्या नाहीत. काही तुमच्यासाठी शिल्लक ठेवलेल्या आहेत, बरं का ?

— लीलाताई

## भरावा मोद विश्वात
## सदा हे ध्येय पूजावे ।

---

"ए ताई, चल ना वरळीच्या डोंगरावर ?"

"अरे थांब सतीश, इथे या बुद्धमंदिरात बघ कसं छान, शांत वाटतंय्. जरा वसू या इथे. हो की नाही, मीना ?"

"होय वाई. इथे खरंच किती शांत नि थंड वाटतंय्. नाहीतर त्या नीलकंठेश्वराच्या देवळात ! एकसारखं कुणीतरी येता-जाता घंटा वडवतंय् आणि आरडाओरडा करतंय्. देवाच्या देवळात आल्यासारख वाटत देखील नव्हतं तिथं."

"अग मी तिकडे जगन्नाथपुरीला गेले होते ना ट्रिपला, तर..." पण शोभाला पुरतं बोलू न देता पुन्हा तिचा हात ओढीत सतीश म्हणाला, "ताई, चल की ग ! मला कंटाळा आला बसून बसून."

आता दोघींचाही नाइलाज झाला. नुकतीच परीक्षा आटोपली होती आणि शोभा–मीना फिरायला आल्या होत्या. तशा त्या गेले दोन-चार दिवस वेगवेगळ्या ठिकाणी जात होत्या, पण आज शोभाचा भाऊ सतीश फारच मागे लागला तेव्हा शोभा त्यालाही बरोबर घेऊन आली.

शोभा कितीदा तरी वरळीच्या डोंगरावर गेली होती. तिला तो छोटासा डोंगर— टेकडीच म्हणा ना—फार आवडायची. तिची पुण्याची मामेबहीण पर्वतीबद्दल सांगायला लागली की शोभा लगेच म्हणे, "हो, आमच्याकडे पण आहे वरळीची टेकडी. अगदी तुमच्या पर्वतीसारखी. तशी मोठ्ठी देवळं नाहीत वर, पण चढायला तश्शीच मजा येते."

शोभा, मीना आणि सतीश तिघंही वरळीच्या टेकडीवर चढून गेली. सतीश आठ वर्षांच्या मानाने तसा चांगलाच दणकट होता, चपळही होता. त्यामुळे या मोठ्या बहिणीला आणि तिच्या मैत्रिणीला काही तक्रारच करता आली नाही. तिघांनीही थोडा वेळ टेकडीवरून वरळीच्या समुद्राच्या लाटांची मजा बघितली. हाजीअल्लीच्या मशिदीकडे जाणाऱ्या लोकांची ती दुरून समुद्रातून चालल्यासारखी दिसणारी रांग पाहून सतीशला फारच गंमत वाटली. वारा छान येत होता. मजा वाटत होती. पण हळूहळू अंधार पडायला लागला आणि तिघांनीही परतायचं ठरवलं.

"आई – ग ...ताई SS !" शोभा – मीनाच्या पुढे पाच – सहा पावलं चालणारा सतीश एकदम ओरडला. कसा कोण जाणे, पण उतरताना त्याचा पाय निसटला आणि तो गडगडत खाली जाऊ लागला. शोभाने पटकन् दोन उड्या मारीत पुढे जाऊन त्याला पकडलं. तो गडगडायचा थांबला; पण त्याला उभं राहता येईना.

"पाय मुरगळला आहे का ग ?" मीनाने विचारलं.

"मुरगळण्यावर निभावलं तर बरं. कुठे फ्रॅक्चर वगैरे नसलं म्हंजे मिळवली. कुठून याला हो म्हटलं असं झालंय् बघ."

सतीशने उभं राहण्याचा प्रयत्न केला, पण त्याला पाऊल खाली

टेकवेना. पाय टेकला की जोरात कळ यायची. शेवटी शोभा आणि मीनाने त्याला कसाबसा हातांच्या झोपाळ्यावर उचलून खाली रस्त्यापर्यंत आणला. लगेच त्यांनी एक टॅक्सी थांबवली आणि त्या त्याला घरी घेऊन गेल्या.

"झालं! गाजवलास पराक्रम?" आई घरी आल्याबरोबर म्हणाली. पण सतीशच्या चेहऱ्याकडे पाहिल्याबरोबर हा त्याचा नेहमीचा क्षुल्लक पराक्रम नसून बरंच लागलं असावं, हे आईच्या लक्षात आलं. तिने शेजारच्या डॉक्टरांना बोलवायला पाठवलं. शोभा जाऊन डॉक्टरांना घेऊन आली.

"मला वाटतं, पाय नुसता मुरगळलेला नसावा. फॅक्चर असावं. त्याला ताबडतोब हॉस्पिटलमधे हालवायला हवं."

शोभाने शेजारच्या दुकानातून तिच्या बाबांना फोन केला आणि सतीशला ताबडतोब डॉक्टरांनी शीवच्या इस्पितळात मुलांच्या वॉर्डमध्ये दाखल करून घेतलं.

शोभाचा चेहरा अगदी कोमेजून गेला होता. मीनाशी गप्पा मारण्याच्या नादात सतीशने आपला हात कधी सोडला ते तिला कळलंच नव्हतं आणि नेमका टेकडीवरचा एक दगड घसरला नि त्याच्याचबरोबर सतीशही गडगडला होता.

सतीशच्या पायाला प्लास्टर घालून त्याला कॉटवर आणून ठेवला.

"अगदी 'पडू आजारी – मौज हीच वाटे भारी–' असं झालंय ना?" बाबांनी त्याला खुलवण्यासाठी म्हटलं.

सतीश हसला आणि म्हणाला, "बाबा, पाय आता मुळीच दुखत नाही आणि डॉक्टर म्हणाले तू आठ दिवसांत बरा होशील;

पण त्यांनी विचारलं की तोपर्यंत इथे न रडता राहशील ना ?"

"मग तू काय म्हणालास त्यांना ?"

"मी म्हटलं, मी एका पायावर तयार आहे."

सतीशच्या बोलण्याने शोभाच्या मनावरचा ताण खूपच कमी झाला. आई रात्री सतीशच्या सोबतीला राहणारच होती; तेव्हा शोभा, मीना घरी जायला निघाल्या. तेवढ्यात वॉर्डबॉयने एका मुलाला हातावर उचलून तिथे आणला. सतीशएवढाच होता तो. वॉर्डबॉयने त्या मुलाला सतीशसमोरच्या दुसऱ्या एका रिकाम्या खाटेवर ठेवला. डॉक्टर आले. त्यांनी त्या मुलाला एक इंजेक्शन दिलं. ते आणि वॉर्डबॉय दोघेही निघून गेले. तो मुलगा गुंगीतच होता. पण त्याच्याजवळ कुणीच नव्हतं. तो एकटाच खाटेवर पडून होता.

●

"हं सतीशभैय्या, ही तुमच्यासाठी गुलाबाची फुलं !" फुलांचा गुच्छ त्याच्यापुढे धरीत मीना म्हणाली.

"आणि ही कॅडबरी !" सुनीता म्हणाली. शोभाच्या सगळ्या मैत्रिणींना सतीश फार आवडायचा. म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी त्या त्याला भेटायला आल्या होत्या.

"ए सुनीताताई, माझा पायच मोडलाय हे बरं. पोटात काही झालं असतं त्या मुलासारखं, तर कॅडबरी कशी खाता आली असती !"

"कोणत्या ? त्या कालच्या मुलाच्या पोटात काही झालंय?" शोभाने विचारलं.

"हो ना. अग रात्रभर कण्हत होता हो विचारा, मग मीच एकदा पाणी दिलं." शोभाची आई म्हणाली.

"ए आई, पण त्याच्या घरचं कुणीच कसं नाही आलं ?"

"अरे नसेलच घरी कुणी त्याच्या !"

"वा: ! असं कसं होईल ? घरी कुणीतरी असतंच !" आई, वडील, भाऊ, बहीण यांच्या प्रेमाच्या कोंडाळ्यात रमणाऱ्या सतीशला घरी कुणी नसतं याचा अर्थच कळत नव्हता.

शोभाने त्या मुलाकडे बघितलं. आता तो टक्क जागा होता. आणि सतीशला भेटायला आलेल्या, त्याला फुलं देणाऱ्या, खाऊ देणाऱ्या या सगळ्यांकडे आसुसल्या नजरेने पाहात होता.

तेवढ्यात नर्स त्याच्यासाठी औषध घेऊन आली.

"मला नको जा–" त्याने ओठ घट्ट मिटून धरले.

"औषधाशिवाय बरा कसा होणार तू ?"

"मला औषधावर चॉकलेट हवं. तर मी घेईन औषध !"

"चॉकलेट ? कोण आणून देणार तुला ? चल, औषध घे मुकाट्याने." नर्सने बळंबळंच त्याला औषध पाजलं आणि ती निघून गेली. तो मुलगा कुशीवर वळला. त्याने त्या सर्वांकडे पाठ केली होती. तरीही तो रडतो आहे हे त्याच्या गदगदणाऱ्या पाठीवरून सर्वांना कळत होतं.

"नर्स ?" शोभाने हाक मारली.

"काय ?"

"या मुलाला काय झालंय ?" शोभाने नर्सजवळ जात विचारलं.

"आव झालीय. काही तरी अरबट चरबट, शिळं, आंबलेलं

खातात आणि ते बाधतं. फारच झालं की आणून टाकतात हॉस्पिटलमध्ये."

"कुणी आणलं याला? त्याचे आई-वडील नाही येत?"

"कोण जाणे कुठे आहेत की नाहीत ते! आमच्या आरोग्याधिकाऱ्यांना एका झोपडीत दिसला तळमळत पडलेला, म्हणून त्यांनी इथं ॲडमिट केला."

"त्याला कॅडबरी चालेल?"

"न चालायला काय झालं? उलट जरा आराम वाटेल पोटाला, पण देणाराय कोण? ही पोरं अशीच तडफडतात." आणि नर्स निघून गेली.

संध्याकाळी शोभा नि मीना दोघीही आल्या होत्या. मीना सतीशजवळ जाऊन बसली आणि शोभा वळली त्या मुलाच्या खाटेकडे. त्याच्या खाटेवर बसत तिने विचारलं—

"ए, तुझं नाव काय?"

"तुला काय करायचंय?"

"मग तुला हाक कशी मारणार मी?"

"नकोच मारू."

"वा! मी माझ्या भावाला सतीश म्हणून हाक मारते, तर तुला नको काहीतरी नावानं हाक मारायला?"

तो मुलगा गप्पच होता.

"ए, तुला फुलं आवडतात की नाही?" आणि शोभाने एक सुंदर फुलांचा गुच्छ त्याच्यासमोर धरला. त्याला पटकन् हसायला आलं. शोभाने तो टेबलावरच्या एका ग्लासात ठेवला आणि त्याच्या तोंडासमोर काहीतरी धरलं.

" चॉकलेट ? " तोंडासमोरचं ते चॉकलेटचं पाकीट पाहून तो ओरडला.

" हो. तुला हवं होतं ना ? "

" तुला कुणी सांगितलं ? "

" कुणी का सांगेना. पण हवं होतं की नाही ? "

" हो. हवं होतं. तुझ्या त्या सतीशला औषध पण नाही देत कडू कडू, तरी त्याला चॉकलेट ! आणि आम्हाला तेवढं कडू औषध घेऊनसुद्धा – "

" हं ! हं ! रुसायचं नाही. आता हे चॉकलेट मिळेल एका मुलाला, पण कडू कडू औषध न कुरकुरता घेतलं तर ! "

" हं, हे घे औषध ! " नर्सने पेला पुढे केला.

" अय्या ! " म्हणून शोभाने मागे वळून पाहिलं. मागे डॉक्टरही उभे होते. ते कौतुकाने शोभाकडे पाहात होते. त्यांनी त्या मुलाला इंजेक्शन दिलं आणि शोभाला म्हणाले –

" अग, तुझं फार कौतुक वाटलं मला मघाशी. खरंच तो पोरगा फार गोड आहे. म्युनिसिपालिटीच्या शाळेत मी व्हिजिटला गेलो की कितीतरी मुलं भेटतात तिथे अशी. सध्या या वॉर्डातसुद्धा चार–पाच आहेत. तू कुणाकुणाला पुरी पडशील ? "

शोभाने पाहिलं. आत्ता रोग्यांना भेटायची वेळ होती. त्या वॉर्डात पंधरा – सोळा मुलं होती. पण पाच – सहा खाटांवरची मुलं अगदी एकटी होती. कुणीच त्यांना भेटायला आलं नव्हतं.

" डॉक्टर, या मुलांना भेटायला कुणी येत नाही ? "

" कोण येणार ? त्यांचं कुणी नाहीच आहे. "

" डॉक्टर— "

" हो. फार आसुसलेली असतात ती. अशा वेळी त्यांना बाकीच्या मुलांचा फार मत्सर वाटतो. मग काहीतरी तक्रारी नि हट्ट करीत राहतात. कधी कधी फार त्रास देतात. औषध घेत नाहीत. ड्रेसिंग करू देत नाहीत. नर्स नि वॉर्डबॉयना फार त्रास होतो या मुलांचा."

डॉक्टर निघून गेले. शोभा जरा वेळ सतीशजवळ बसली आणि मग ती नि मीना घरी गेल्या. आई सतीशजवळच राहिली.



" आज रमेश चॉकलेटशिवायच औषध घेणार आहे न कुर-कुरता ! " शोभा म्हणत होती. नाव न सांगण्याचा त्या पोराचा हट्ट जिभेवर विरघळणाऱ्या कँडबरीबरोबरच केव्हाच विरघळून गेला होता.

" हूं. आणि आज गोष्ट कसली सांगणार ? "

" बकासुर आणि भीमाची. " आणि शोभा जोरजोरात हसायला लागली.

" काही एकसारखं चिडवायला नको. " रमेश फुरंगटून म्हणाला.

" वरं बाई, नाही चिडवीत. गोष्ट तर ऐकशील ?" आणि शोभाने त्याला अगदी हलक्या आवाजात गोष्ट सांगायला सुरुवात केली.

" अरे वा ! केशर आज अगदी उठून तैयार ! "

" मग तुझीच वाट पाहात होते मीनाताई. " पलीकडच्या एका खाटेवरची केशर म्हणाली. तिचा उजवा हात गळच्यात अडकवलेला होता. खूपच अशक्त दिमत होती ती.

" हं , चला ! कसलं चित्र रंगवणार ? "

" अग पण ताई, मी डाव्या हातांनी कसं रंगवू ? आणि कागद कसा धरू ? "

" कागद धरायलाच नको. तो छान राहील अडकून आपल्या आपण – हा अस्सा. " आणि मीनाने बरोबर आणलेल्या पॅडला कागद अडकवला, मग खडूची पेटी केशरच्या डाव्या बाजूला ठेवली. तिच्या डाव्या हातात एक खडू दिला आणि म्हणाली, " हं, बघ तर डाव्या हाताने रंगवून ! "

छोटी सहा सात वर्षांची केशर डाव्या हातात खडू धरून पॅड-वरचं झाडाचं चित्र रंगवायचा प्रयत्न करीत होती. मीना तिला मदत करीत होती.

"अरे, अरे बलबीर, ऐसे रोते नहीं ! क्या हुआ ?" सुनीता तिसऱ्या खाटेवरच्या एका मुलाचे डोळे पुशीत म्हणाली.

"दीदी, इंजेक्शन बहुत दुखता है. मेरेसे सहा नहीं जाता. वह नर्स तो ऐसी है..." रडत रडत नाक पुशीत बलबीर तक्रार करीत होता.

'हां ! हां ! समझदार बच्चे ऐसा नहीं बोला करते ! बोलो, आज बुखार उतरा है ?"

"तुमही देखो !"

सुनीताने बलबीरच्या कपाळावर हात टेकवला. मानेवर, गळ्यावर हात लावून बघितलं. ताप लागत नॅव्हता.

"अरे वाह ! बलबीर, बुखार तो भाग गया. नर्स के इंजेक्शन से शायद डर गया हो !"

बलबीर खुदकन् हसला.

"अच्छा ! बुखार नहीं हे. अब ऊठ बैठो अच्छी तरहसे. हम आज ताश खेलेंगे !"

"ओ दीदी !" म्हणून बलबीर खुशीत उठून बसला आणि त्या दोघांचा पत्त्याचा डाव रंगला.

"हां हां...जरा सम्हालके... और एक चक्कर लगायेंगे न शहीदा ?"

मंजू एका छोट्या मुलीला हाताला धरून चालवीत होती. तिला एक लाकडी पाय लावलेला होता. हळूहळू एक एक पाऊल टाकीत शहीदा चालण्याची सवय करीत होती.

गेले आठदहा दिवस त्या वॉर्डचं वातावरण पार बदलून गेलं

होतं. शोभा आणि तिच्या मैत्रिणींनी ज्या मुलांचं कुणी नव्हतं त्यांचा ताबा घेतला होता. गोष्टी, खेळ, गप्पा, व्यायाम ... सगळं कसं हसत, मजेत चाललं होतं. मुलं औषधं घ्यायला कुरकुरत नव्हती म्हणून नर्स खूष होती. मुलं मुकाट्याने ड्रेसिंग करून घेतात. इकडून तिकडे नेता आणतानांही त्रास देत नाहीत म्हणून वॉर्डबॉय खूष होते. आणि डॉक्टर...

कुठलीही इमर्जन्सी केस नसल्याने ते या वॉर्डात गेल्या आठवड्यात आले नव्हते. दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये जास्त गरज होती, तिकडे जात होते.

आज ते व्हिजिटला इकडे आले, तर मंजूचा हात धरून शहीद आपल्या लाकडी पायाने चालत त्यांना सामोरी आली. ते चकितच झाले ! त्यांनी वॉर्डभर नजर फिरवली. कायाकल्प झाल्यासारखं वॉर्डचं रूप ते आश्चर्याने डोळे भरून पाहात होते. इतकी शांतता, इतका आनंद त्यांनी इथे कधीच बघितला नव्हता. शांतता असायची, पण त्या दुर्मुखलेल्या मुलांची. भ्यालेल्या, अबोल, एकाकी मुलांची. या मुलांना असं हसता-खेळताना कधी बघायला मिळेल हेही त्यांच्या मनात आलं नव्हतं.

नेहमीप्रमाणे त्यानी सगळ्या मुलांची चौकशी केली. सतीशला आता चांगलंच बरं वाटलं होते. प्लास्टर सकाळीच काढलं होतं. उद्या तो घरी जाणार होता.

डॉक्टर शोभाजवळ जाऊन म्हणाले, " अहो, फ्लॉरेन्स नायटिंगेल, जरा इकडे या."

आणि व्हरांड्यात तिला नेऊन तिच्या पाठीवर शाबासकी देत ते म्हणाले –

" उद्या तुझा भाऊ घरीं गेल्यावर तू इथे येणार नसशील ?"

" माझी सगळी भावंडं घरी जाईपर्यंत आम्ही सगळ्या येणार आहोत."

" अरे वा ! पण इथली भावंडं एकाला खो देऊन दुसरी येतात म्हटलं !"

" मग आम्हीही कायम त्या खो खोच्या खेळात सामील आहोत असं समजा, डॉक्टर !" शोभा ताठ मानेने म्हणाली.

" खर ! तुम्ही पोरींनी लाजवलंत सर्वांना. मला तुमचा इतका अभिमान वाटतो आहे ! माझ्या या वॉर्डचं हे पालटलेलं रूप आता कायम असंच राहील याबद्दल खात्री वाटते मला. पोरींनो, तुम्हाला काय बक्षीस देऊ ?"

" आम्हाला नेहमी इथे आमच्या भावंडांजवळ यायची परवानगी !"

डॉक्टर पुन्हा तिची पाठ थोपटीत निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी सतीश घरी जायला निघाला. सगळ्या मुलांनी त्याला हसून निरोप दिला. शहीदा आपल्या लाकडी पायाने चालत त्याला दारापर्यंत पोचवायला आली होती.

सतीश दाराबाहेर पडला आणि एक मुलगा वॉर्डबॉयने आणून त्या खाटेवर झोपवला. पेंगुळलेला, दमलेला, उदास चेहऱ्याचा.

" अग शोभा, येतेस ना ?" आईने बाहेरून विचारलं.

" अग या भावाला सांगून येते." असं म्हणून ती त्या नव्या मुलाच्या खाटेजवळ जाऊन म्हणाली–

" मी येईन वरं का संध्याकाळी ?" तो आश्चर्याने पाहातच राहिला. कारण सगळी मुलं शोभाला निरोप देत म्हणत होती...

" अच्छा शोभाताई, लौकर ये हं !"

## प्रभूची लेकरे सारी
## कुणा ना तुच्छ लेखावे ।

---

" डिस्को दिवानेऽऽऽ "
" हां हां ! हां हां ! "
" अरे प्यार किया तो डरना क्या... "
" या हूऽऽऽ ... "
" बंबईसे आया मेरा दोस्त... "
" रंग बरसे भिगी चुनरियावाली... "
" अरे वा रे अमिताभ... ! "

मोठमोठ्याने नाचत, गात पोरांचं टोळकं चाललं होतं. पाठी-वर बांधलेल्या पिशव्या, खांद्यावर शबनम, पाण्याच्या बाटल्या आणि हातात काठ्या. उत्साह नुसता ओसंडून वाहात होता. शहरवस्ती संपून आता जंगलाची वाट सुरू झाली होती. जंगल तसं दाट नव्हे, पण शहरातल्या मुलांना थोडंसं घाबरवणारं आणि सहलीचा बराचसा आनंद देणारं होतं.

" ए मन्या, अरे ते बघ त्या झाडावर काय ? "

" अरे ते मधमाशांचं पोळं ! "

" आयडिया ! आपण मधमाशांचं ते पोळं काढू या का ?

ब्रेडवर लावायला छान जॅम होईल."

"वा: ! काय पण आयडिया ! अहो वीर, त्या मधमाशांना डिवचलंत तर त्या जाम चिकटून बसतील अंगात. निघायच्या पण नाहीत !"

"इतक्या डसतात ?"

"डसतात म्हंजे ? अरे त्यांच्या नांग्या डसल्या की माणूस मरतं आग आग होऊन !"

"करेक्ट ! त्या जैत रे जैत पिक्चरमध्ये नाही का दाखवलंय?"

"हे पिक्चरवीर बोलले. यांना सगळे पुरावे मिळतात पिक्चर-मधे. कधी पुस्तकात वाचून याला काही सापडलंय ?"

"माहीत आहे तू मोठा वाचणारा आहेस तो. पुस्तकातला किडा कुठला !"

"कोण मी ? किडा ? पुन्हा बोल !"

आणि जंगलात संरक्षणासाठी घेतलेल्या काठ्या एकमेकांच्या डोक्यावर बसणार असा रंग दिसायला लागला.

"अरे, अरे, त्या काठ्या आपण काही एकमेकांना मारायसाठी नाही आणलेल्या. भांडताय् काय ?" सुभाषने दोघांचं भांडण सोडवीत म्हटलं.

"काय रे प्रकाश, सरांनी सांगितलेलं ते तळं कसं नाही अजून दिसत ?"

"अरे इतक्यात कुठून दिसणार ? आपल्याला आणखी आत जायला हवं !"

"आणखी आत ? अरे आत्ताच झाडी किती दाट व्हायला लागलीय !"

" काय मनोजी ! आत्ताच घाबरगुंडी उडाली का ? आपल्याला रात्र काढायची आहे म्हटलं या जंगलात !"

" घाबरगुंडी नाही म्हटलं !"

" घाबरगुंडी नाही तर भित्तरकुंडी ! एकूण एकच."

गप्पागोष्टी करीत, एकमेकांना चिडवीत, धीटपणे तरीही थोडं सावधपण ठेवूनच ही पोरांची टोळी जंगलातून वाट काढीत होती. शिक्षकांनी सांगितलेलं ठिकाण त्यांना गाठायचं होतं. तळ्याच्या आसपास तंबू ठोकायचा होता आणि तिथे रात्री मुक्काम करायचा होता. तशी ही मुलं पूर्वी स्काऊटकॅपला जंगलात राहिलेली होती. पण त्या वेळी त्यांच्या बरोबर स्काऊटशिक्षक होते. या वेळी मात्र मुलं मुलंच आली होती. कारण तसं हे जंगल एका गावाजवळचंच होतं. शिवाय वाघ–सिंह वगैरे मोठे प्राणी तिथे असण्याचीही शक्यता नव्हती.

आता गाणी, गप्पा संपून मुलं गुपचूप पुढं जात होती. बरीच वाट त्यांनी तुडवली होती. उंच उंच झाडांमुळे उन्हाचा ताप होत नव्हता, तरी दिवस बराच वर आल्यामुळे तशी उष्णता जाणवत होती. मुलांचे चेहरे घामाघूम झाले होते.

" अरे, ते बघ तळं !"

" कुठे ?"

" ते काय समोर ! काय मस्त बगळे बसलेत रे पाण्यावर पांढरे शुभ्र !"

तळं दिसलं होतं. आता पायपीट संपली होती. थकल्याभागल्या चेहऱ्यांवर जरा टवटवी आली, पाऊल जरा भराभर उचललं जाऊ लागलं. मुलं तळ्यावर गेली. त्यांनी तिथेच जवळ खाद्या-

वरच्या, पाठीवरच्या पिशव्या ठेवल्या. हातपाय धुतले. थंड पाणी तोंडावर मारलं. त्यांना आता चांगलीच हुशारी वाटू लागली.

इतक्यात तळ्याच्या पाण्यावर त्यांना दोन डोकी दिसली. त्यांच्याचसारखी लहान. आणि पाठोपाठ सपासप हात मारलेले दिसू लागले. बघता बघता त्यांच्याचएवढी तेरा चौदा वर्षांची दोन मुलं तळ्याच्या पाण्यातून बाहेर आली. अंगावर कपडे म्हणजे फक्त लंगोटी. बाकी उघडबंब.

पाण्याने निथळत ते या मुलांकडे बघत उभे होते.

"काय बावळटासारखी बघताहेत रे ही ध्यानं !"

"तर काय ? आणि लंगोटीचा रंग बघ! कधी जन्मात साबणाने धुतली नसावी."

"अरे लंगोटीचं काय ? यांच्या अंगांना तरी जन्मापासून इतक्या वर्षांत कधी साबण लागला असेल का ?"

"त्यांना एकदा टी. व्ही. वरची जाहिरात दाखवायला हवी."

"हो ना ! जो ओ. के. से ऽ ऽ नहाये– ऽ ऽ ...!"

आणि टी. व्ही. वरची जाहिरात, अगदी जश्शीच्या तश्शी गाण्याच्या तालासुरावर कोरसमध्ये सुरू झाली. ती दोन्ही मुलं आता तर अगदी डोळे फाडफाडून यांच्याकडे आश्चर्याने बघत होती. त्यांनी हे असं काही आजपर्यंत बघितलं नव्हतं, ऐकलं नव्हतं.

आता या मुलांना त्यांची चेष्टा करण्याची जास्तीच लहर आली. त्यांनी त्या दोघांना हातांना धरून ओढलं आणि वेडं-वाकडं नाचायला सुरुवात केली.

"अरे, हे लोकनृत्य आहे. तुम्हाला कसं येत नाही ?"

" सुभ्या, ते सगळं फोटोपुरतं असतं. ही पात्रं काय लोकनृत्य करणार ? "

" ए, आपण यांना डिस्को डान्स शिकवू या ? "

आणि मुलांचा धांगडधिंगा फारच वाढला. त्या दोघा मुलांनी आपली कशीबशी सुटका करून घेतली आणि जवळच्याच एका झाडाखाली ते दोघे जाऊन बसले.

ती मुलं गेल्यावर या सहलवाल्या मुलांचाही उत्साह ओसरला. चालून चालून ती दमलीही होती. तेव्हा सर्वांनी आधी डब्यांवर ताव मारायचं ठरवलं.

" ए, आपण त्या दोघांना काही देऊ या का खायला ? "

" त्यांना काय त्याची चव ? "

" का ? गुळाची पोळी आहे ! "

आणि एकदम खसखस पिकली.

" तसं नाही, पण त्यांनी कधी असले चांगले पदार्थ खाल्ले नसतील ! "

" ए, ए -- "

" अरे, हे घ्या तुम्हाला खायला देतो. "

" इकडे या रे -- "

मुलांनी बसल्या जागेवरूनच हाकाटी चालवली, पण ती दोघं मुलं झाडापासून तसूभरही हालली नाहीत. आपलं या मुलांकडे लक्षच नाही असं दाखवीत ती गवताच्या काड्या चघळीत स्वस्थ रेलून बसली झाडाच्या खोडाला.

" अरे, गवत खाताहेत बघ ! "

" आरं -- माज्या ढवळ्या -- पवळ्या -- रंऽऽऽ ! "

आणि हसण्याचा एकच कल्लोळ उठला. तरीही त्या मुलांनी यांच्याकडे दुर्लक्षच केलं. ज्याला चिडवायचं ते माणूस चिडेनासं झालं की चिडवणारालाही मजा वाटत नाही. सहलवाल्या मुलांचं तेच झालं. शिवाय आता खूप वेळ गेला होता. अजून त्याना तंबू ठोकायचा होता.

मग भराभर कामाला सुरुवात झाली.

"अरे, ही खुंटी पक्की नाही बसली अजून!"

"कशी बसणार? ठोकायला काय आहे?"

"का? तो पलीकडचा दगड घे तात्पुरता. मग मी हातोडी देतो."

"अरे इथले सगळे दगड फुसके आहेत. ठिसूळ. जोरात ठोकायला लागलं की भुगा होतो."

"ए, दोऱ्या ताणा रे नीट."

"हो, तंबू चांगला उघडायला हवा. हा लंबू उभा नि आडवा दोन्ही प्रकारे मावायला हवा ना!" त्याने प्रकाशकडे पाहात म्हटलं.

तंबू उभारल्यावर सर्वांनी आपापल्या पिशव्या आत नेऊन ठेवल्या. हे सगळं होईपर्यंत उन्हं कलली होती. इतका वेळ उन्हात काम करून सर्वांची डोकीही तापली होती. तेव्हा तंबू तयार झाल्याबरोबर सगळ्या मुलांनी ताणून दिली. पेंगल्या पेंगल्या ज्या थोड्या गप्पा झाल्या तेवढ्याच. थोड्याच वेळात तंबू शांत झाला.

ही झाडाखाली बसलेली दोन मुलं आता उठली. त्यांनी झाडांमधून धावायला सुरुवात केली. मधूनच फांद्यांना लोंबकळत झोके देत जात. मधेच थांबून एखाद्या झाडाची अगर वेलीची फळं

काढून घेत. मिटक्या मारीत खात नि पुढे जात. फिरता फिरता त्यांनी बरेच वाभळीचे फोकही जमा केले होते. तो सगळा भारा एका वेलीच्या कड्याने बांधून त्यांनी डोक्यावर घेतला. काटे लागू न देता भारा डोक्यावर कसा घ्यायचा या कलेत दोघेही तरबेज होते खरं तर हे सरपण त्यांना घरी घेऊन जायचं होतं. रोजच्याप्रमाणे त्यांनी मावळतीला तळ्यापलीकडे जायला हवं होतं. पण आज त्यांना या मुलांबद्दल फारच कुतूहल वाटत होतं. वाभळीचा भारा त्या मघाच्या झाडाखाली ठेवून दोघं तंबूजवळ आली. तंबूभोवती चक्कर मारली. आत डोकावून पाहिलं आणि झोपलेली मुलं जागी होताहेत असं दिसताच दोघे पुन्हा झाडाखाली जाऊन बसले.

●

तंबूतली मुलं जागी झाली. आता चांगलाच अंधार पडला होता. मुलांनी पुन्हा डबे उघडून पोटपूजा केली आणि सगळे तंबूबाहेर आले.

शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी सकाळीच काटक्याकुटक्या जमवून ठेवल्या होत्या. तिघांनी तीन मोठमोठे दगड आणले. बाकीच्यांनी लहान लहान दगड आणून एक छोटासा चौथरा तयार केला. मग त्यावर त्या काटक्याकुटक्या पसरून शेकोटी पेटवली.

शेकोटीभोवती बसून सर्वांनी गाणी म्हणायला सुरुवात केली. आधी काही सैनिकगीतं झाली. आणि नंतर हिंदी सिनेमाच्या गाण्यांनी जवळजवळ अर्धी रात्र जागवली. झाडाखाली वसलेली मुलं अजूनही शांतपणे यांच्याकडे बघत होती. या मुलांना त्यांचं आता कुतूहल वाटत नव्हतं, पण आश्चर्य मात्र वाटत होतं.

" ए, ती दोघं मुकी आहेत का ? आपण एवढं बोललो पण एक शब्द देखील बोलली नाहीत."

" अरे आपली भाषा येत नसेल त्यांना, आदिवासी असतील."

" पण आपसांतही बोलत नाहीत."

" जंगली आहेत झालं ! "

आणि याबरोबर एकदम रंग पालटला. " मुझे कोई जंगली कहे – – " चा सूर नि ठेका दुमदुमू लागला. ती पोरंही आता खदखदून हसायला लागली.

" जातीची ओळख पटली रे ! " ही मुलं तुच्छतेने म्हणाली.

कँपफायर चांगलाच रंगला, पण आता काटक्याकुटक्या संपल्या होत्या. शेकोटी विझून चालली होती. पुन्हा कशी पेटवणार ? शिवाय डोळ्यांवर झोप आली होती. नाचून गाऊन सगळी दमली होती तेव्हा त्यांनी तंबूत आपापल्या जागा पकडल्या तंबूच्या दारातून त्यांना ती दोघं मुलं अजूनही झाडाखाली पसरलेली दिसत होती.

" ही पोरं अशी काय करताहेत ? इथून जातच नाहीत. "

" होय की ! अगदी पाळत ठेवल्यासारखी बसून आहेत. "

आता चेष्टा आणि कुतूहलाची जागा थोड्या भीतीने घेतली.

" यांच्याजवळ लाकडं तोडायच्या कुऱ्हाडी आहेत रे ! शिवाय धनुष्य–बाण पण आहेत."

" ही आदिवासी माणसं आपल्यासारख्या शहरातल्या माणसांना लुटतात म्हणे !" भित्रा मन्या म्हणाला.

" अरे काय बिशाद ! ती दोघं आहेत आणि आपण आहोत बारा. आपण पुरून उरू त्यांना."

" आणि कसली फाटकी आहेत ते पाहिलंस ना ? पाप्याची पितरं दिसताहेत. खायला कुठे मिळतंय पोटभर ! दोन थपडांत खाली लोळतील." सुभाषला आपल्या आडदांडपणाचा फारच गर्व होता. आज आपला पराक्रम गाजवायला संधी मिळणार... येऊच देत ती पोरं खोडी काढायला, असं त्याला वाटत होतं.

तरीही सर्वांनी तंबूच्या दाराची कापडी झडप ओढून घेतली. थोड्याच वेळात सगळी मुलं गाढ झोपी गेली.

मध्ये किती वेळ गेला, कोणास ठाऊक. पण अचानक मुलं कसल्यातरी आवाजाने जागी झाली.

" कसला रे आवाज हा ?"

" कुणी तरी प्राणी ओरडतो आहे."

" अरे, कुई कुई... म्हणजे हा कोल्ह्याचा आवाज. पण बाप रे ! बरेच कोल्हे असावेत. कोल्हेकुई म्हणतात तशी वाटते आहे ही."

" कोल्हे तंबू फाडून आत येतील का रे ?"

" येतीलसुद्धा. पण घाबरायचं नाही. आपल्या या काठ्यांनी त्यांना बडवून काढू." सुभाषने सर्वांना धीर देत म्हटलं.

आता कोल्हेकुईचा आवाज जास्तच जवळ येऊ लागला मुलं आपापल्या काठ्या घेऊन तंबूत सरसावून बसली होती.

आणि अचानक त्यांना वेगळाच आवाज ऐकू आला. घुमल्यासारखा.

" वाघबीघ तर नसेल ?"

पण आता तो आवाजही बदलला. कोल्हे ओरडता ओरडता एकदम विव्हळल्यासारखे करू लागले. आता मात्र सुभाषने तंबूची दाराची झडप उघडली आणि समोरच्या दृश्याने तो थक्क झाला.



ती दोन आदिवासी मुलं त्या कोल्ह्यांशी लढत होती. कोल्हे पुन्हा पुन्हा चवताळून हल्ला करीत होते. ही मुलं आपल्या-जवळच्या कुऱ्हाडींनी त्यांना फटके मारीत होती. बाभळीच्या फोकांनी त्यांना ओरबाडून काढीत होती. दोघं पोरं गरगर फिरत होती नि कोल्ह्यांना चढाई करायला वावच देत नव्हती. कोल्हे तंबूकडे यायला लागले की त्यांना तावडतोब मागे फिरायला भाग पाडीत होती.

आता सुभाषला राहवेना. "चला रे!" म्हणून त्याने सर्वांना काठ्या घेऊन बाहेर बोलावलं. ही मुलं तंबूतून बाहेर पडली आणि त्यांनीही कोल्ह्यांवर काठ्यांचा मारा केला: यांची कुमक आल्यावर त्या दोघांनाही जोर चढला. काही वेळ . . . चार रानटी कोल्हे आणि ही चौदा रत्नं! एकच रणकंदन माजलं होतं. पण सरतेशेवटी कोल्ह्यांनी हार खाल्ली. त्यांना यांनी चांगलंच चौदावं रत्न दाखवलं. केकटत, लंगडत दोन कोल्हे जंगलात पळून गेले. दोघांना मात्र बाभळीच्या फोकांनी इतकं झोडपलं गेलं होतं की त्यांची सालडी निघाली होती. शिवाय एकाच्या डोक्यावर कुऱ्हाडीच्या पात्यांनी एवढ्या मोठ्या जखमा केल्या होत्या की त्यांनी तिथेच तडफडून प्राण सोडले.

त्या दोघा मुलांच्या अंगातूनही ठिकठिकाणी रक्त वाहात होतं. कोल्हे मेलेले पाहताच ही मुलं आता प्रथमच सहलवाल्या मुलांकडे वघून हसली. अगदी प्रसन्नपणे. आणि निघून जाऊ लागली.

पण आता या मुलांनी त्यांच्याभोवती कोंडाळं केलं. तेवढ्यात दिलीप प्रथमोपचाराची पेटी घेऊन आला होता.त्याने या दोघांना खाली बसवलं. त्यांच्या जखमा धुवून औषध लावलं. पट्ट्या बांधल्या. ती मुलं मुकाटपणे सगळं करून घेत होती. अजूनही त्यांच्या चेहऱ्यावर तेच प्रसन्न हसू होतं. कोल्ह्यांशी केलेल्या लढाईचा अभिमान आणि सर्वांचे जीव वाचवल्याचं समाधान असं विलक्षण मिश्रण त्या हास्यात उमटलं होतं.

"खरंच, आज तुम्ही होतात म्हणून आम्ही वाचलो." गौतम म्हणाला.

"हो ना. तुमचे कसे आभार मानावे तेच समजत नाही."

आडदांड सुभाष भरल्या गळ्याने म्हणाला. त्याने त्या दोघांचेही हात हाती घेतले होते.

त्या मुलांना शब्द कळत नव्हते. पण भाव समजत होते. त्यांच्या हातवाऱ्यांवरून आणि चेहऱ्यावर उमटलेल्या प्रतिक्रियेवरून "आम्ही फार काही केलं नाही. पण तुम्ही शहरातली माणसं. तुम्हाला जंगलाची कल्पना नाही. हे कोल्हे नेहमीच इथे येतात. म्हणून आम्ही दोघं झाडाखाली पहाऱ्यावर बसून राहयलो. आम्हाला तुमची नाचगाणी खूप आवडली !" हे असं सगळं, हा अर्थ या मुलांना त्यांच्या मूक भाषेतून कळला.

हळूहळू रात्र संपली. सगळी मुलं स्तब्ध त्या तंबूजवळच बसून होती. पाखरं किलबिलू लागली. तळ्याच्या काठी सूर्य उगवताना दिसू लागला. ही दोघं आदिवासी मुलं पटकन् सूर्याकडे तोंड करून उभी राहिली. आणि त्यांच्या भाषेत सूर्याला हात जोडून प्रार्थना करू लागली.

त्या स्तब्ध वातावरणात त्यांच्या त्या आदिवासी प्रार्थनेचे सूर एक प्रकारची धुंदी पसरवू लागले. सहलवाली मुलंही आपसूक उठून उभी राहिली. त्यांनी नकळत हात जोडले. शब्द येत नव्हते, पण स्वर जमले होते. यांनीही त्या दोघांच्या प्रार्थनेत तोच सूर मिसळला. दोन प्रमुख गायकांनी गावं आणि बाकीच्यांनी सूर धरावा तशी प्रार्थना रंगत होती.

आपल्यासारखी नाच–गाणी येत नाहीत, शिक्षण नाही, कपडे नाहीत, स्वच्छता नाही, काहीच शहरी संस्कार नाहीत या जाणिवेने मनात भरून राहिलेली त्यांच्याबद्दलची तुच्छतेची भावना सर्वांच्या मनांतून केव्हाच विरून गेली होती. त्यांच्या जगात ती

किती श्रेष्ठ आहेत याची जाणीव झाली होती.

त्या दोघा मुलांनी प्रार्थना संपताच तळ्यात उड्या मारल्या. आता या मुलांनीही भराभर कपडे उतरवून त्या मुलांच्या पाठोपाठ तळ्यात उड्या मारल्या.

आता तळ्यात सगळीच्या सगळी चौदा मुलं पोहत होती, बुड्या मारीत होती. सर्वांच्या अंगावरून एकच पाणी वाहात होतं. सगळी फक्त मुलं होती.

**सदा जे आर्त अति विकल**
**तया जाऊन हसवावे।**

---

" वाई, पटवळ घ्या नं. लई कवळं हाये बगा !"

" अवो दादा, काकडी तर वगा. अशी लुसलुशीत हाये, इर-घळल जनू काय जिभंवर !"

" अगो मावशीबाय, म्येथी तर घ्ये चार जुड्या. हिरवीकंच हाये नवरीच्या साडीचोळीवानी."

" घ्या फुलावर, टमाटर लालबुंद. या...या...भिकूशेट...ओ सकूबाय...सस्ती लावली भाजी. तोंडली हाय..."

भाजीबाजार नुसता गजबजून गेला होता. आज बाजाराचा दिवस. तशी रोजच ताजी भाजी यायची विकायला. पण आज कृष्णाकाठच्या वांग्यांचे ढीगच्या ढीग दिसत होते. कुणाकडे मेजवानीसाठी हारेच्या हारे भरून जात होते तर कुणी एखादं मेथीची जुडी नि अर्धा किलोभर तोंडली फक्त लहानशा पिशवीत घेत होतं.

सारिका आज प्रथमच भाजीबाजारात आली होती. कंपाऊंडरने तिला तिथे सोडलं होतं आणि तो थोड्या वेळाने तिला परत न्यायला येणार होता.

भाजीबाजारातल्या कोलाहलाने ती अगदी बावरून गेली. कुणाकडून काय भाजी घ्यावी ते तिला समजेना. ती बघत बघत पार टोकापर्यंत गेली बाजाराच्या.

" अवो ताईसाब, घ्या ना भाजी. ताजी काडलीय आत्ताच मळ्यातनं ! "

एक तिच्याच एवढी बारा-तेरा वर्षांची मुलगी भाजीच्या तीन-चार टोपल्या पुढे ठेवून बसली होती. रसरशीत पांढराशुभ्र घट्ट फुलावर, हिरव्यागार मेथीच्या जुड्या, लालबुंद टोमॅटो, ओल्या दरवळणाऱ्या वासाची कोथिंबीर— भाजी कशी डोळ्यात भरत होती.

सारिकाने पाहिलं, कुणी दोन-चार खेडवळ दिसणारी माणसं फक्त तिच्याजवळची भाजी घेऊन गेली. बाकी मात्र तिला वगळून पुढे जात होती. इतकी सुंदर भाजी डावलून पुढे जाणाऱ्या माणसांचं सारिकाला आश्चर्य वाटलं. तिने आपल्या पिशव्या पुढे केल्या. ती मुलगी अगदी गोड हसली.

" ताईसाब, कंची भाजी देऊ ? "

" मेथीच्या चांगल्या चार जुड्या दे."

" मेथी लई आवडती व्हय ? "

" अग, माझ्या बाबांना मेथीच्या वड्या आवडतात."

" आईसाबांसाठी काय देवू ? "

" अं ..आईसाठी ना ? फ्लॉवर दे आणि त्या शेवग्याच्या शेंगा पण दे."

" हां. ह्ये घ्या. आन् ताईसाब, तुमच्यासाठी वं ? की तुमी सोता भाजी खातच नाय ? "

"वा: ! खात नाही कशी ? भाजी खाल्ली नाही तर बाबांना चालत नाही. त्यांनी औषध देण्यापेक्षा भाजी खाल्लेली बरी. या डॉक्टर लोकांना औषध द्यायची फार हौस."

"डागदर हायेत तुमचे बाबा ?"

"हो. का ग ?"

"न्हाई, येरवाळीच इच्यारलं मग काय घेऊ ?"

"टोमॅटो दे आणि ती कोथिंबीर दोन जुडचा. काय ग, ही भाजी कुठून आणलीस तू ?"

"कुठून म्हंजी ? म्यां आमच्या मळयातूनच आनली न्हवं का? म्यां, माजी आई, बाबा समदी भाजी काढतो न्हवं का मळयात?"

"तुझं नाव काय ग ?"

"गजरा !"

"ए गजरा, मला तुझ्या मळयात नेशील ?"

"नग नग... तुमच्या आईसायबास्नी पटनार न्हाई !"

"का ? का नाही पटणार ?"

पण गजराने काहीच उत्तर दिलं नाही. सारिकालाही बराच उशीर झाला होता. म्हणून तिने पिशवीत भाजी भरली. पैसे दिले आणि ती पुन्हा बाजाराच्या दुसऱ्या टोकाला कंपाऊंडरची वाट पाहात उभी राहिली.

घरी गेल्या गेल्या तिने सगळी भाजी आईपुढे ओतली.

"अरे वा: ! खूपच ताजी भाजी आज मिळालेली दिसतेय !" भाजी पाहून खूष होत आई म्हणाली.

"हो ना ! बरं का आई, अगदी एक माझ्याएवढीच मुलगी बसली होती ही भाजी घेऊन. गजरा बरं का तिचं नाव ? ती,

तिची आई, वडील सगळे मळ्यात काम करतात. त्यांचा स्वतःचा मळा आहे म्हणाली." सारिका उत्साहाने सांगत होती.

"तरीच ! अग स्वतःच्या मळ्यात कष्ट करून केलेली म्हणूनच इतकी चांगली आहे हो भाजी, सारिका. मोलाने दुसऱ्याकडे काम करणं आणि स्वतःच्या मळ्यात खपणं यात फरकच असतो"

"आणि बरं का आई, मी म्हटलं मला तुझ्या मळ्यात नेशील का, तर गजरा म्हणाली तुझ्या आईला आवडणार नाही."

"अग असंच वाटतं या गरीबगुरीब माणसांना. आता हे बघ, खूप उशीर झालाय. मावशी यायचीय ना जेवायला ! तिच्या आवडीचा फ्लॉवरभात करायचाय. छान मिळालाय फ्लॉवर. जरा माझ्या मदतीला लाग बरं !"

आणि मग रोजचा सारिकाचा हा नियमच ठरला. आता भाजीबाजार तिला ठाऊक झाला होता. त्यामुळे कंपाऊंडरने बरोबर येण्याची गरज नव्हती. ती एकटीच सायकलवरून जाई. गजराशी गप्पा मारी. ताजी ताजी रसरशीत भाजी रोज घेई आणि आईला खूष करी. गजराची आणि तिची आता चांगलीच गट्टी जमली होती. गजरा तिला शेतातल्या, मळ्यातल्या गोष्टी सांगे. पाटाचं पाणी, मोटेची विहीर, लावणी, कापणी, सगळं सगळं शहरातून आलेल्या सारिकाला नवीनच होतं. तसंच तिने सांगितलेल्या शाळेच्या गमतीजमतीमध्ये गजरा रंगून जाई.

"गजरा, तू का ग नाही शाळेत येत ?"

"अवं गुरुजी मला घरीच शिकवत्यात. आमाला कोन घ्येनार साळंत ?"

"तुम्हाला म्हंजे ?"

पण सारिकाच्या या प्रश्नाला काहीच उत्तर न देता गजरा पुन्हा एकदा गप्प झाली.

●

त्या दिवशी सकाळपासूनच थोडासा पाऊस पडत होता. तशी घरात भाजीही शिल्लक होती. त्यामुळे सारिका भाजी आणायला गेली नसती तरी चाललं असतं. आईनेही तसंच सांगितलं होतं. पण जरा उघडीप झाली तेव्हा गजराला भेटायची लहर आवरेना, म्हणून सारिका सायकल घेऊन बाहेर पडली.

पण ती भाजीबाजारात पोचेपर्यंत उघडला उघडला म्हटलेला पाऊस पुन्हा मुसळधार कोसळायला लागला. भाजीवाले कसल्या ना कसल्या छपराच्या आश्रयाला गेले होते.

सारिका पाण्याने पार चिंब भिजून तिथे पोचली. आणि तिने पाहिलं तर तशाच पावसात, कोसळणाऱ्या धारांमध्ये भिजत गजरा आपल्या टोपल्या घेऊन बसली होती.

"अग गजरा, हे काय, पावसात काय बसलीस ? ऊठ, ऊठ." असं म्हणून सारिकाने आपली सायकल बाजूला ठेवली आणि पलीकडे एका दुकानाच्या वळचणीला दोन भाजीवाल्या थांबल्या होत्या, तिथे तिनं गजराला ओढून नेलं.

गजरा जवळ आलेली पाहताच त्या दोघी भाजीवाल्यांनी ओरडा करायला सुरुवात केली.

"चल हट, दूर हो." म्हणून त्या दुरूनच तिच्या अंगावर ओरडायला लागल्या. गजरा भिऊन पळायला लागली तर सारिकाने तिला धरून ठेवली.

"अवो, ताईसाव, हात लावू नका. म्हारोगी हाये ती. तुमालाबी रोग लागल."

सारिका आश्चर्याने पाहू लागली. तेवढ्यात कुणीतरी गजराला चप्पल फेकून मारली. एकीने लाकडाच्या मोळीतली ढलपी फेकली. गजरा रडत रडत दूर पळाली. कांय होतंय ते सारिकाला कळेना. महारोगी वगैरे तिने वाचलं होतं, ऐकलं होतं. पण गजराला मारलेलं तिला सहन झालं नाही. गजराच्या पाठोपाठ तीही धावली. लाकडाची ढलपी लागून गजराच्या कपाळातून रक्त येत होतं. चांगलीच खोक पडली होती.

गजरा रडत होती. "ताईसाब, म्यां तुमास्नी सांगितलं न्हाई. भाजी घेत ग्येले, पण म्यां खरंच बरी झाल्ये हाये वो! आता कुट्टं कुट्टं रोग न्हाई."

"रोग न्हाई म्हनं! असा काय ह्यो रोग बरा होतो व्हय कंदी?"

"ताईसाव, तुमास्नी फशिवलं ह्या पोरटीनं! तुमी रोज भाजी न्येत होता हिच्याजवळून?"

"काय ग पोरी, तुला तोंड नव्हतं का उचकटाया? त्येनला सांगितलं न्हाईस?"

भाजीबाजारात एकच गलका सुरू झाला होता. पाऊस थांबला होता. सगळया भाजीच्या टोपल्या आणि त्यांच्या मालक-मालकिणी आपापल्या जागांवर येऊन बसल्या होत्या. गजराला शिव्या देत होत्या.

"उद्याच्यान् इथं दिसलीस तर पग!" म्हणून त्या तिला बजावत होत्या. सारिका पार गोंधळून गेली होती. पण गजराच्या कपाळातून येणारं रक्त पाहून तिने लगेच आपला रुमाल काढला आणि तिच्या कपाळावर बांधला. गजराचं रडं थांबत नव्हतं.



सारिकाला अवतीभोवती चाललेला कोलाहल आता ऐकू येत नव्हता. गजरा त्यांच्या दृष्टीने कुणीही असो. सारिकाच्या दृष्टीने ती फक्त तिची मैत्रीण होती.

सारिका रुमाल बांधून गजराच्या कपाळावरचं रक्त पुसून काढीत होती, तेवढ्यात कंपाऊंडर त्या तिथे येऊन पोचले. कुणी-तरी दवाखान्यात हा झालेला गोंधळ सांगितला होता. डॉक्टर व्हिजिटला गेले होते त्यामुळे कंपाऊंडरच धावत तिथे आले.

"सारिकाताई, हे काय करताय?" असं म्हणून त्यांनी सारिकाचा हात पकडला.

"काका...अहो...हे काय?" तिने आणखी काही म्हणायच्या आतच कंपाऊंडरने एक टांगा थांबवला. सारिकाचा हात धरून तिला टांग्यात बसवलं, तिची सायकलही टांग्यात चढवली आणि टांगा घराकडे पिटाळला.

या प्रकारामुळे सारिका चांगलीच चिडली होती, पण काकां पुढे तिचं काही चालेना. शिवाय काकांनी काही न बोलता तिला इतकं अचानकपणे टांग्यात घालून आणलं होतं की त्या धक्क्यातून सावरायला तिला वेळच लागला.

सारिकाने आपली सायकल टांग्यातून काढून घेतली, बागेत स्टँडवर लावली आणि ती घरात जाऊन आईकडे तक्रार करणार तेवढ्यात आईच दरवाजात येऊन तिला घरात घेऊन गेली.

"अग सारिका, हे काका काय सांगताहेत?"

"अग पण आई ..." तिला पुढे बोलू न देता आईने विचारलं, "सारिका, तू मला सांगत होतीस ती गजरा कोण आहे ते ठाऊक होतं तुला?"

"कोण म्हणजे? भाजीवाली. आणि माझी नवी मैत्रीण!" सारिका म्हणाली.

"म्हणे भाजीवाली आणि माझी नवी मैत्रीण! अग जरा तरी चौकशी करायचीस? तिच्याकडची भाजी दुसरं कुणी का घेत नाही हे विचारलंस कुणाला? तिला शाळेत का घेत नाहीत हे तरी विचारलंस? मला वाटलं फक्त गरीबच आहे ती. आणि तू रोज तिच्याकडची भाजी आणलीस? आपण इतके दिवस तीच

भाजी खात होतो ? त्या महारोगी पोरीकडची ? कसला गोंधळ करून ठेवला आहेस त्याची कल्पना आहे तुला ?" आईचा राग अनावर झाला होता.

" गोंधळ कसला ? अग ती म्हणाली तिचा रोग बरा झालाय!"

" बरा ? हा रोग काय बरा होतो ?

" आणि बाईसाहेब, सारिकाताईना आधी स्वच्छ आंघोळ करायला सांगा. त्या कार्टीचं रक्त पुसून जखम बांधीत होत्या त्या." कंपाऊंडरकाका म्हणाले.

" बाई ! बाई ! आता मात्र शर्थ झाली हो तुझ्यापुढं ! अग काय नडलं होतं तुझं ? गेलं असतं थोडं रक्तं वाहून. नासकंच तर ते !"

" अग पण आई, ती बरी ..."

" पुन्हा: पुन्हा तेच रामायण ऐकवू नकोस. जा, आधी जाऊन स्वच्छ आंघोळ कर. जा म्हणते ना ?"

आईच्या या सांगण्यावर कुरकुरत का होईना, पण सारिकाला आंघोळ करणं भाग पडलं.

" नसता जिवाला घोर लावलान् हो या पोरीनं !" आई अगदी बेचैन झाली होती. इतके दिवस त्या पोरीच्या हातची, तिने पिकवलेली, विकलेली भाजी आपल्या सर्वांच्या पोटात गेली, आता काय होणार या भीतीने तिच्या मनाचा थरकाप होत होता. सारिकाला मात्र कधी कधी बाबांनी सांगितलेलं, पुस्तकांत वाच-लेलं आठवत होतं. स्वच्छ गजरा डोळ्यांसमोर दिसत होती. त्यामुळे आईने इतका गोंधळ का माजवावा, तेच तिला कळत नव्हतं.

संध्याकाळी डॉक्टर घरी आले तर सगळीकडे सामसूम दिसत होती. सारिका आपल्या खोलीत फुरंगटून बसली होती आणि पुढे काय होणार या चिंतेने आई डोकं धरून बसली होती.

" हे काय ? आज सगळी सामसूम ? सारिका कुठाय ?" डॉक्टरांनी आल्या आल्या विचारलं. पण आपल्या प्रश्नाला उत्तर मिळालं नाही त्यामुळे त्यांना फारच आश्चर्य वाटलं. सारिकाच्या आईच्या चेहऱ्याकडे लक्ष गेल्याबरोबर ते म्हणाले, " हे काय ? बरं नाही की काय तुला ?"

" आता सगळ्यांनाच बरं नाहीसं होणारे !" आणि आईच्या डोळ्यांतून अश्रू पाझरायला लागले.

" अरे रडायला काय झालं ?"

" फार घोटाळा केलाय हो पोरीनं !

" कसला ?"

" रोज हौसेनं भाजीला जात होती. चांगली छान ताजी भाजी आणीत होती. त्या पोरीशी मैत्री जमवली होतीन् आणि आज कळलं ती पोर महारोगी आहे. आता कसं होणार हो आपलं सगळ्यांचं ? इतके दिवस पोटात ते विष गेलंय."

आणि सारिकाच्या आईला हुंदक्यामागून हुंदके येऊ लागले.

" सारिका कुठाय ?"

" आहे आपल्या खोलीत. फुरंगटून बसलीय मी रागावले म्हणून !" आईने कसंबसं सांगितलं.

डॉक्टर तडक सारिकाच्या खोलीत गेले. ती आरामखुर्चीत छताकडे बघत बसली होती.

" सारिका . . . ए पोरी . . . " डॉक्टर तिच्याजवळ गेले

आणि त्यांनी तिच्या केसांवरून हात फिरवला, " सांग बरं मला काय झालंय् ते सगळं ! "

" काही नाही. आता तुम्ही तुमच्या दवाखान्यातली सगळी औषधं आणा. पाजा सगळ्यांना. म्हंजे काही उपयोग झाला तर होईल. नाहीतर मरणारच आहोत आपण सगळी ! " सारिका रागावूनच म्हणाली.

" अरे ! अरे ! मी एवढा डॉक्टर असताना आपण कशाला मरायचं सगळ्यांनी ? काय ग ? "

" कशाला म्हंजे ? ते काय आता टळणार आहे ? मी रोग कालवलाय ना सर्वांच्या पोटात ? मी मूर्ख ! मी गाढव ! " आईबद्दलचा राग उफाळून आला, होता. आणि एकीकडे अश्रू गळायला लागले.

" हे बघ, ते आपण नंतर ठरवू. आधी मला सांग पाहू हा काय गोंधळ आहे सगळा तो ! " आणि डॉक्टर तिच्या पाठीवरून हात फिरवू लागले.

सारिका आता जराशाने शांत झाली.

" बाबा, आज खूप पाऊस पडत होता. गजरा तशीच पावसात भिजत बसली होती. सगळ्या भाजीवाल्या कुठे कुठे कोरड्यात उभ्या होत्या. मी पण गजराला एका आडोशाला घेऊन गेले तर तिला मारलं त्या लोकानी. तिच्या कपाळाला खोक पडली. रक्त यायला लागलं. मी ते माझ्या रुमालानं पुसून जखम बांधली. तेवढ्यात कंपाऊंडर काका आले आणि मला जबरदस्तीने टांग्यातून घरी घेऊन आले. माझ्या मैत्रिणीला एवढं लागलं तर मी तिची जखम बांधू नाही ? का मारलं त्या लोकांनी तिला ?

असं का करतात सगळी ? आईने पण इतकं कशाला रागवायला हवं ? ”

“ अग पण ती तुझी गजरा – – ”

“ हो. महारोगी आहे असं सगळी म्हणतात ! ” बाबांना मध्ये अडवीत सारिका म्हणाली. “ पण ती म्हणते की तिचा सगळा रोग गेलाय. ती बरी झालीय. मग तरी का तिला त्रास द्यायचा ? ”

“ ती असं म्हणाली तुला ? ”

“ हो. मला आधी काहीच ठाऊक नव्हतं. आजच कळलं. नेहमी तिच्याकडून कुणी भाजी घ्यायचं नाही त्याचं आश्चर्य वाटायचं मला बाबा, पण आज – – ” आणि पुन्हा गजराला मारलेलं आठवून तिला रडू फुटलं.

“ बाबा – – बाबा – – आता खरंच आई म्हणते तसं आपल्याला सगळ्यांना काहीतरी होणार का हो ? आई म्हणते हा रोग कधीच बरा होत नाही. सांगा ना बाबा – – ”

बाबा थोडा वेळ गप्पच होते. मग म्हणाले, “ हे बघ, तुझ्या आईला तशी काळजी वाटणं साहजिक आहे. ही गजरा कुठे राहते, ठाऊक आहे तुला ? ”

“ तिने मला तिच्या घरी कधी नेलं नाही. पण ती स्टेशनपलीकडच्या आश्रमात राहते म्हणाली. ”

“ असं ? मग चल आपण आताच जाऊ तिच्याकडे ? ”

“ हो बाबा ? आपण गजराकडे जायचं ? तुम्ही येणार ? सारिका आनंदाने फुलून आली. ”

“ हो, तिला लागलंय ना ? बघून येऊ या. ”

बाबा नि सारिका आश्रमात येऊन दाखल झाली. व्यवस्थापक डॉक्टरांना ओळखत होते. त्यांनी त्यांचं प्रेमाने स्वागत केलं.

" तुमच्या इथे गजरा म्हणून कुणी मुलगी आहे ना ? " डॉक्टरांनी विचारलं.

" हो, आहे ना. फार चुणचुणीत आहे. "

" ती आमच्या या सारिकाची मैत्रीण झालीय आताशा. आज सकाळी म्हणे तिला लागलं म्हणून ही भेटायला आलीय. तिला जरा पाठवता गजराकडे ? "

" हो ! हो ! तिला फार आनंद होईल. "

आणि व्यवस्थापकांनी एका मुलाबरोबर सारिकाला धाडल्यानंतर डॉक्टर म्हणाले–

" या गजराचा काय रिपोर्ट आहे ? "

" ती अगदी पूर्ण बरी झालीय ! "

" मला बघायला मिळेल रिपोर्ट ? "

" हो. का नाही ? आता दाखवतो. " आणि व्यवस्थापकांनी रजिस्टरमधून गजराचा रिपोर्ट काढून डॉक्टरांजवळ दिला.

डॉक्टरांनी तो वाचला आणि म्हणाले, " फार छान ! "

व्यवस्थापक जरा गोंधळले होते. त्यांनी विचारलं, " काय झालंय, डॉक्टर ? "

" अहो काही नाही. आमच्या सारिकाला ही पोरगी आवडली. ती रोज तिच्याकडून ताजी भाजी घरी घेऊन यायची. गजराचं एकुलतं एक गिऱ्हाईक पण आज भाजीबाजारात – – "

" हो. कळलं मला सगळं. गजरा म्हणाली मैत्रिणीने जखम बांधली. "

" ती मैत्रीण म्हंजे आमची सारिकाच."

" काय सांगता ? पण म्हणून शंका येऊन आपण – – "

" हो. तुम्ही ज्या अर्थी तिला भाजी पिकवायला देता, ती विकायला पाठवता त्या अर्थी ती निरोगी असणार हे मी धरूनच चालले होते. पण हे सगळं आजच प्रथम आमच्या घरी समजलं, त्यामुळे जरा गोंधळ झाला. तेव्हा म्हटलं, खात्री करून घ्यावी म्हणजे घरी आणि भाजीबाजारातही सर्वांना सांगायला बरं ! "

तेवढ्यात गजरा आणि सारिका दुरून येताना दिसल्या. डॉक्टर मोठ्या कौतुकाने गजराकडे पाहात होते. तिच्या पायांची फक्त दोन बोटं नव्हती. पण बाकी कशी उमललेल्या फुलासारखी सतेज दिसत होती.

" हं ! भेटली का मैत्रीण ? "

" हो, बाबा ! आणि आता लागलेलं दुखतही नाही म्हणते ती."

" सारिकाताई, रोज या मैत्रिणीने पिकवलेली भाजी खाल्लीत, पण तिला काही खायला प्यायला घरी बोलावलं नाहीत ! "

" पण बाबा, ती मुळी येतच नव्हती. मी एकदोनदा बोलावलं होतं. "

" मग आता बोलावून पाहा. "

" खरं ? गजरा येतेस ? "

" न्हाई बा. आमच्यासारक्यांनी – – "

" हे बघ पोरी, ते आमच्यासारक्यांनी वगैरे सोडून दे. तू सारिकासारखीच आहेस. चल आज आमच्या घरी. "

गजरा व्यवस्थापकांकडे पाहू लागली. त्यांनी जा म्हटल्याबरोबर तिला आश्चर्य वाटलं आणि आनंदही झाला.

" हं ! जरा चहा आणि झक्क काहीतरी खायला करा बरं ! खूप भूक लागली आहे. सारिकाची एक मैत्रीण पण आलीय ! "

" ही कोण नवी मैत्रीण आणखी ? "

" नवी नाही, आई. जुनीच. अग हीच गजरा ! " सारिका म्हणाली.

" काय ? " आणि आई गजराकडे डोळे विस्फारून पाहू लागली.

" हे बघा, आधी चहा करा. मग सगळं सांगतो. "

नाइलाजाने पण डॉक्टरांच्यावरच्या विश्वासामुळे आईने चहा-पोहे केले. सर्वांनी एकत्र मिळून खाल्ले.

नंतर गजरा गेल्यावर डॉक्टरांनी आईला आणि सारिकालाही सगळं समजावून सांगितलं. " महारोगी एकदा औषधाने पूर्ण बरा झाल्यावर त्यापासून कुणालाच धोका नसतो. त्यांना असं वाळीत कशासाठी टाकायचं ? ही गजरा तर संपूर्ण निरोगी आहे. तिला सारिकासारखंच एक निरोगी मुलगी म्हणूनच सर्वांनी स्वीकारायला हवं. चांगल्या माणसालासुद्धा असं चुकीच्या कल्पनेने वाईट समजून–माणसाचे अधिकार नाकारून–आपण शिकलेल्या, विचार करणाऱ्या माणसांनीसुद्धा असं वागवलं तर – – "

डॉक्टर सांगत होते. आई आणि सारिका ऐकत होत्या.

गावकऱ्यांना अजून समजवायचं होते. पण दुसऱ्या दिवशी गजराकडून सारिकाने आणलेली भाजी खाताना ती फारच चांगली लागते आहे. हे आईनेसुद्धा कबूल केलं. आजवर नकळत, पण आता गजरा कोण आहे ते समजूनही.

आणि सारिका गजराचं कायमचं गिऱ्हाईक तर झालीच, पण

त्यांची मैत्री जास्त पक्की झाली. कारण आता गजरा आणि ती अधूनमधून एकमेकींकडे जात होत्या. भेटत होत्या. गप्पां मारीत होत्या. खेळत होत्या. सारिका जितकी टवटवीत होती तितकीच गजराही होती. दोघींच्यात गजराच्या नसलेल्या, कापून टाकलेल्या पायांच्या दोन बोटांची काहीच अडचण येत नव्हती.

**कुणा ना व्यर्थ शिणवावे**
**समस्तां बंधु मानावे ।**

---

" द्येवा पांडुरंगा, सोडीव रे-बाबा ! अग आई ग ऽऽ .."

" आई फार दुखतंय का ग ?" आईचं कण्हणं ऐकून आत येता येता मल्हारीने विचारलं.

" आरं दुकनारच ! दुकनंच जर तसं जालंया तर मंग दुसरं काय व्हनार ? आता योकच आस न्हायलीया, त्येवडं इट्टबानं लौकर घिऊन जावं त्येच्या पाशी. अगाई ग ऽऽ !" पुन्हा पोटावर हात दाबीत पार्वती कण्हू लागली.

" अग आई, असं काय म्हणतेस ? तुला लौकर बरं वाटणार आहे."

" वाटंल बरं ! आता तुजा लहानग्याचाच आशीरवाद काम करनारे. बाबा रं, कशापायी नसती आशा धरतुयास ? डागदरानं सांगितलं न्हाई का ? द्येवावरच भरोसा पग आता ! पर आनखी सोसाया नगंसं वाटतंया !" पार्वतीला खूप वेदना होत होत्या. गेले तीन चार महिने ती जास्तच आजारी होती. मल्हारी तिच्या त्या थकलेल्या, वेदनांनी सुरकुतलेल्या चेहऱ्याकडे पाहू लागला. त्याला आठवली त्याची पूर्वीची आई...

" आये, मी येऊ का तुझ्या बरोबर शेतावर ?"

" तू कशापायी येतुस ? उन्हातान्हाचा जीव गलबलला म्हंजी ? तू ऱ्हा घरीच."

" अग पण आई– आज शाळेला सुट्टी आहे. मास्तरांच्या पोरीचं लग्न आहे."

" आस्सं ! मंग चल तर. म्यां म्हनलं साळा बुडवूनश्यान येतुयास की काय !"

आणि मल्हारी आईबरोबर शेतावर निघाला. सडसडीत बांध्याची त्याची आई तुरुतुरू चालत होती. डोक्यावर चटणी-भाकरीची टोपली आणि हाताशी मल्हारी. तिचं बोट धरून धावताना मल्हारीची तिरपीट उडत होती. पण आई त्याच्या-बरोबर कशी छान छान बोलत होती.

" मल्हारी, प्वारा ! साळा सिकून श्येना व्हईस बरं का ? तुज्या दादाला लई आग्राव क्येला म्यां. पन त्यो काई साळंत ग्येला न्हाई. आरं चार बुकं सिकल्याबिगर जगाचं काय बी श्येनपन येनार न्हाई."

तशी मल्हारीला शाळा आवडायची. पण कधी कधी शाळा बुडवून ओढ्यात पोहायला जावं, चिंचा पाडायला रानात जावं असं वाटे त्याला आणि तसं तो मधूनमधून करीतही असे. पण आईला ते कुठून कसं कळे कोण जाणे ! एरव्ही प्रेमाने बोलणारी आई त्या वेळी अशी काही रागवे...

" दोडा, साळा बुडवून ग्येलास ना चिंचा पाडायला ? आरं जलमभर काय लोकाच्या चिंचाच पाडीत बसनारेस ? का दोन चार आन्याच्या मोलमजुरीवर काम करनारेस ? पुन्यांदा मला

समजू द्ये तर साळा बुडवलीस म्हून .. मंग म्यां हाये नि..."

मल्हारीला वाटलं, आई आता आपल्याला खूप मारणार. शाळा बुडवल्यावद्दल त्यालाही अपराधी वाटतच होतं. तो आईपुढून सटकू पाहात होता, तेवढ्यात आईने त्याचं बखोट धरून त्याला आपल्यासमोर उभा केला. आता दोन थोबाडीत बसणार असं मल्हारीने मनात आणलं, तेवढ्यात त्याचे दोन्ही गाल कुरवाळीत आई म्हणाली, " राजा, नगं रं आसं करूस. तू लई सिकणार हायेस, मोटा व्हनार हायेस, मला जोशीबाबानं सांगितलं हाय ! मला पगायचं हाय रं तुला सिकलेला. माझी ही योकच विच्छा हाय रं .." आणि त्याच्या गालावरून आईच्या डोळ्यांतल्या पाझरणाऱ्या पाण्याचे थेंब टपटपू लागले.

त्या दिवसापासून मल्हारीने कधीच शाळा बुडवली नाही. त्याचं शिक्षणात लक्षही चांगलं होतं.

गेल्याच वर्षी तो आठवीच्या परीक्षेत तिसरा आला तेव्हा आईने त्याचं किती कौतुक केलं होतं. त्या दिवशी जेवताना तिने गोडाचा त्याला आवडणारा शिरा केला होता. त्याचा भाऊ त्याला चिडवीत म्हणालासुद्धा–

" वा: काय ऐट हाये एका मुलाची ! आये, मी शिक्षान सोडलं त्येच बरं जालं ! "

" का रं ? "

" अग मंग हृयेचं कसं काय कवतिक जालं असतं ? "

मल्हारीला भावाचा जरा रागच आला. म्हंजे आम्ही एवढं अभ्यास करून, मेहनत घेऊन शिकावं तर त्याचं कौतुक नाही. आई काय, दादा शिकला असता तरी माझं कौतुक केल्याशिवाय

राहिली असती का ? आईला काय समजतो हा ? तिचं माझ्या-वर किती प्रेम आहे !

तो फुरंगटून बसलेला पाहून आई म्हणाली, " आरं जेव निगु-तीनं तुजा दादा असाच. आपुन शिकाचं न्हाई आन् – – " .

" अग आई, म्हंजी हृये भलंतच, म्यां तर समदं कवतिक राकून ठिवलं मल्हारीसाठी. व्हय की न्हाई, मल्हारी ? "

आणि दादाने त्याच्या पाठीवरून इतक्या प्रेमाने हात फिरवला की दादाबद्दल आपण उगीच गैरसमज करून घेतल असं त्याला वाटलं.

" द्येव अशीच किरपा करू द्ये तुज्यावर, आसाच पास व्हत जा ! द्येवाचीच करतूत समदी ! " आई म्हणाली.

" अग आई, पण मी अभ्यास केला. माझे कष्ट नाहीत का ? सगळी कृपा देवाचीच कशी ? "

" आरं, तू अभ्यास क्येलास त्ये ठीक, पन् द्येवाची किरपा बी असावी लागती. मानसांनी करायचं त्ये मानसानं करावं. पर द्येवाला साकडं घालाया इसरू नये. त्येचं बळ लाभतं मानसाच्या प्रेयत्नांना ! "

असंच त्याला आई काहीबाही सांगे.

आता मल्हारी नववीत होता. फौजदारांचा विजय आणि तो एकाच वर्गात होते. दोघांची मैत्रीही जुळली होती. मल्हारीच्या आईला त्याच्या शिक्षणाचं, वागण्याचं फार कौतुक वाटत असे. आणि आईसाठी काय वाट्टेल ते झालं तरी अभ्यास करून खूप शिकायचं असं मल्हारीनंही ठरवलं होतं. त्याने आणि विजयने स्वप्नं रंगवली होती.

" विजय, तू कोण होणार पुढे ? "

" मी ? मी बाबांसारखा फौजदार होणार आहे आणि गावातल्या सगळ्या गुंडांना जाम खलास करणार आहे. पण तू रे मल्हारी ? "

" मी ना ? मी होणार आहे डॉक्टर. गावातलं एक पण कुणी औषधावाचून मरता कामा नये."

आणि सहाच महिन्यांपूर्वी तो एक दिवस शाळेतून घरी आला तर – –

" काय – – काय झालं बाबा आईला ? "

त्याची आई खाटेवर निपचितशी पडली होती. डॉक्टर आले होते. तिला इंजेक्शन देत होते. मल्हारीचे वडील, भाऊ, वहिनी सगळी जणं चिंताक्रांत होऊन शेजारी उभी होती.

" दादा, आईला काय झालं असं एकाएकी ? "

" अरे, शेताच्या वाटेवरच चक्कर येऊन पडली. साळूमावशीनं नि शांताक्कानं धरून घरी आणलं. "

" कधीपासून असा त्रास होतोय ? " डॉक्टरांनी विचारलं.

" आवं, न्हेमीच म्हन्त्यात प्वाटात दुकतं म्हून. पन कंदी औषादं घ्याया तैयारच न्हाईत. म्हनं थांबल सुंठ–जायफळ घ्येतल्यावर. " वहिनीने सांगितलं.

" मला वाटतं त्यांना मुंबईला न्यावं तपासण्यासाठी. दुखणं साधं नाही, असा माझा तर्क आहे. " डॉक्टरांनी सल्ला दिला.

दुसऱ्याच दिवशी मल्हारीच्या आईला त्याचे बाबा मुंबईला घेऊन गेले. मल्हारीची बरोबर जायची फार इच्छा होती पण त्याची परीक्षा असल्यामुळे त्याला जाता आलं नाही.

आई दोन महिने मुंबईच्या हॉस्पिटलमध्ये होती. मल्हारी एक-दाच शनिवार-रविवार भेटून आला होता. आणि आईची अवस्था बघून पार भेदरला होता.

" मल्हारी, कशी आहे आई ?"

" विजय -- फार फार खराब झाली आहे रे. आधी का नाही सांगितलन् ? "

" पण काय झालंय रे नेमकं ?"

" विजय -- मला कुणी आधी सांगतच नव्हतं. पण मग मी डॉक्टरना खूपच आग्रह केला तेव्हा त्यांनी मला सांगितलं– 'तू शिकतो आहेस, धीराचा आहेस म्हणून सांगतो, तुझ्या आईला कॅन्सर झालाय. फार पुढे गेलंय दुखणं.' 'पण डॉक्टर,' मी म्हणालो, 'तुम्ही नाही का बरी करणार तिला ?' 'आपण प्रयत्न करायचे एवढंच --' डॉक्टर असं म्हणाले आणि मला लगेच बाबा इकडे परत घेऊन आले. विजय, आई बरी होईल ना रे ? "

" अरे, डॉक्टर प्रयत्न करताहेत ना ? "

" हो पण -- "

आणि त्यानंतर लगेच आठ दिवसांतच मल्हारीची आई परत गावी आली. तेव्हापासून तिचं दुखणं वाढतच होतं. डॉक्टरी उपाय चालू होते पण सर्वांनाच काय ते कळून चुकलं होतं. मल्हारी मात्र फारच अस्वस्थ होता. आज तर तिच्या यातना त्याला बघवेनात.

तो आईच्या खाटेजवळून उठला आणि तसाच बाहेर पडला.

रविवार असल्यामुळे शाळेला सुट्टीच होती. तो तडक विजयकडे गेला.

" ये, ये, मल्हारी, कशी आहे तुझी आई आज ? "

" विजय, मी देवाला साकडं घालायला जाणार आहे."

" देवाला साकडं ? ते कशासाठी ? "

" आईसाठी ! " त्याला आईचं बोलणं आठवत होतं- 'द्येवाच्या किरपेचं बळ मिळतं माणसांना – –'

" मल्हारी, मी स्पष्ट बोलतो म्हणून रागावू नकोस. पण देवाला साकडं घालून आईला बरं वाटेलसं वाटतं तुला ? आपले शास्त्राचे सर काय सांगतात ?"

" ते ठाऊक आहे रे. पण का कोण जाणे, आज मला सारखं वाटतंय की विठोबाच्या पायावर डोकं ठेवून त्याला सांगावं–देवा, निदान आईच्या वेदना तरी कमी कर."

मल्हारी इतकं आतडं पिळवटून बोलत होता की विजयला जास्त वाद घालावासा वाटेना. दोघेही विठोबाच्या देवळाकडे निघाले.

विठोबाची पूजा नुकतीच आटोपली होती. पुजारीबुवा लोकांना तीर्थबुक्का वाटीत होते. विजय नि मल्हारी थोडा वेळ बाहेर थांबले. देवळातली सगळी गर्दी ओसरल्यावर देवाला निवांतपणे विनवण्यासाठी मल्हारी पुढे झाला. बाहेरच्या पायऱ्यांवरून चढून आत येऊन तो गाभाऱ्यात पाऊल टाकणार तोच पुजारीबुवा एकदम ओरडले–

" अरे काय करतोस कारट्या ? तू ढसाळबाबाचा मल्हारी ना? आणि गाभाऱ्यात येतोस ?"



"हो. मला देवाच्या पायांवर डोकं ठेवून साकडं घालायचंय !"

"मग त्यासाठी दुसऱ्या जातीत जन्माला यावं लागतं. महाराचं घर कशाला निवडलंस बाबा ?" पुजारीबुवा खवचटपणे म्हणाले.

"पुजारीबुवा, मंदिरात प्रवेश करायला कुणालाही मनाई करता येत नाही." विजय म्हणाला.

" अरे जा रे, असशील मोठा फौजदाराचा लेक ! पण इथे या देवळात सत्ता माझी आहे ! समजलास ?"

विजयने मल्हारीला हाताला धरून बाहेर आणलं. मल्हारी नाही म्हणत होता, पण विजयने सक्तीनेच त्याला देवळातून बाहेर खेचला.

" अरे पण...मला देवळात जायचा अधिकार..." मल्हारी कुरकुरत होता.

पण विजयने त्याला देवळाच्या आवारातल्या पिंपळाच्या पाराखाली बसवलं आणि तो त्याला काहीतरी समजावून सांगू लागला.

मग मल्हारी तिथेच पारावर बसून राहिला आणि विजय निघून गेला. विजयचं घर देवळापासून अगदी जवळ होतं.

त्यांचा बेत ठरल्याप्रमाणे विजय दुरून देवळाकडे येताना दिसताच मल्हारी पारावरून उठला आणि हळूहळू चालत देवळाच्या सभामंडपामध्ये गेला. त्याच्या पाठोपाठ विजयही येऊन उभा राहिला. मल्हारीने दुरूनच देवाला नमस्कार केला.

" देवा...माझ्या आईला लौकर बरी कर."

" होय, देवा ! आमच्या मल्हारीच्या आईला लौकर बरी कर." विजयही हात जोडून म्हणाला.

" आणि देवा, त्यासाठीच मी तुला साकडं घालायला आलो आहे की निदान तिच्या वेदना तरी कमी कर. हे बघ मी तुझ्या पायांवर डोकं ठेवून–" असे म्हणून तो गाभाऱ्यात घुसू लागला. तेवढ्यात पुजारीबुवा उठले. गाभाऱ्याच्या दाराच्या चौकटीला दोन्ही हात धरून उभे राहिले. त्याला अडवीत म्हणाले–

"हां हां ! एकदा सांगितलं ते शिरलं नाही का डोक्यात ? आत पाऊल तर टाक, नाही तुझा पाय उखडला तर पुजारीपणाचं नाव सांगणार नाही."

"पण त्यासाठी त्याचा पाय तुम्हाला धरावा लागेल. तो विटाळ चालेल का, पुजारीबुवा ?" विजय त्यांना चिडवीत म्हणाला.

"चूप ! ही पोरं पार शेफारलीत हल्ली ! शाळा शिकताहेत ना ? लहान नाही, मोठं नाही...चल रे म्हारड्या, हो मागे .."

पण तेवढ्यात मल्हारी त्यांचा हात मागे सारून गाभाऱ्यात घुसलाच. मग मात्र पुजारीबुवांना राहवेना. त्यांनी गंध उगाळायचं मोठ्ठं थोरलं खोड उचललं आणि मल्हारीला फेकून मारलं. पण ते त्याला न लागता त्यांचा नेम चुकून मागून येणाऱ्या फौजदारांना लागलं फौजदारांनी पुजारीबुवांचा हात पकडीत म्हटलं, "वा: ! शीतल चंदनाचा छान उपयोग करताय, पुजारीबावा...!"

"त...त....तुम्ही !" आता मात्र पुजारीबुवांची तंतरली. फौजदारांच्या मुलापुढे त्यांनी शौर्य दाखवलं तरी प्रत्यक्ष फौजदारांना पाहिल्यावर ते हाबकलेच.

"हं पुजारीबुवा, पळीपंचपात्री उचला आणि चला चौकीवर."

"चौकीवर ? मी काय चोरीमारी केलीय ?"

"चोरी नाही पण मारी केलीत आत्ता. शिवाय कायद्याविरुद्ध वागून तुम्ही गुन्हा केला आहात. या गुन्ह्याला शिक्षा आहे, माहीत आहे ना ?"

"गुन्हा ? शिक्षा ?" भोळेपणाने पुजारीबुवा म्हणाले.

"हे पाहा, उगीच भोळसटपणाचा आव आणू नका. माझ्याकडे

काही तक्रारी आल्याच होत्या तुमच्याबद्दल. पण प्रत्यक्ष पुरावा नव्हता. आज तुम्हाला मी स्वतःच गुन्हा करताना पकडलं आहे. मंदिरप्रवेशाच्या कायद्याप्रमाणे तुम्ही वागला नाहीत. कायदा मोडलात. कुठल्याही हरिजनाला तुम्ही मंदिरात मज्जाव करू शकत नाही हे ठाऊक आहे ना तुम्हाला ?" फौजदार पुजारी-बुवांना समज देत म्हणाले.

" पण अगदी गाभाऱ्यात ..."

" पुन्हा तेच ! चला माझ्यावरोबर मुकाट्याने."

पुजारीबुवांचा आता मात्र नाइलाज झाला. विजय आणि मल्हारीकडे खाऊ की गिळू अशा नजरेने पाहात ते मुकाट्याने फौजदारांबरोबर चालू लागले.

एव्हाना देवळाबाहेर बरीच गर्दी जमली होती. पण विजयला आणि मल्हारीला त्याचं भानच नव्हतं. जमलेल्या गर्दीने एवढंच बघितलं की मल्हारी गाभाऱ्यात जाऊन पांडुरंगाच्या पायांवर डोकं ठेवून म्हणतो आहे–

" देवा, आई यातून बरी होणार नाही हे ठाऊक आहे रे मला. पण निदान तिच्या वेदना तरी कमी कर. मला नाही सहन होत तिचं दुःख !"

विजय मल्हारीजवळ देवापुढे हात जोडून उभा होता. बाहेर-च्या गर्दीतल्या काहींनी डोळे टिपले. काहींनी हात जोडले, आणि ते मल्हारीच्या पाठीमागे गाभाऱ्यात जाऊन उभे राहिले.

कुणीतरी वाजवीत असलेली सभामंडपातली घंटा मल्हारीच्या प्रार्थनेला प्रतिसाद देत होती.

## असे हे सार सत्याचे
## परार्थी प्राणही द्यावे ।

" देवा तुझिया चरणी नमितो
अंतःकरणी तुज आठवितो
कृपासागरा तुज विनवितो
सांभाळी बाळा..."

मास्तर प्रार्थना शिकवीत होते. मुलं त्यावरहुकूम म्हणत होती. बाकापाशी उभं राहून, हात जोडून प्रार्थना म्हणणाऱ्या मुलांकडे बघता बघता मास्तर दचकले. तिसऱ्या बाकावरची कडेला बसणारी एक मुलगी उभीही राहिली नव्हती, हातही जोडलेले नव्हते आणि प्रार्थनाही म्हणत नव्हती.

मास्तर थोडा वेळ थांबले. प्रार्थना संपून सगळी मुलं खाली बसली मग मास्तर त्या बाकाजवळ जाऊन म्हणाले,

" कौसल्या, उभी रहा."

कौसल्या निमुटपणे उभी राहिली.

" प्रार्थनेला उभी राहिली नाहीस."

" नाही."

" हात जोडले नाहीस."

" नाही."

" प्रार्थना म्हटली नाहीस."

" म्हटली नाही. म्हणणारही नाही. हातही जोडणार नाही आणि उभीही राहणार नाही." असं म्हणून कौसल्या पुन्हा बाकावर बसली.

" कौसल्या ? उभी राहा आणि हात पुढे कर."

आणि कौसल्याच्या हातावर सपासप चार पट्ट्या ओढल्या गेल्या

" कौसल्या, तू प्रार्थना..." मास्तरांचं ते बोलणं मध्येच तोडीत कौसल्या म्हणाली–

" मी म्हणणार नाही प्रार्थना. म्हणे कृपासागरा...हा कसला कृपासागर ? याने माझ्या आईला माझ्या लहानपणीच नेलं. माझा बा लई बीमार आहे. पण त्याला न्हाई औषधपाणी, न्हाई खाया प्याया. त्याचं मजुरीचं काम बी सुटलं. आमी दोघं आठ दीस उपाशी आहो. काय क्येलं देवानं ? दिलं काई ? क्येला आमचा सांभाळ ?" कौसल्या पोटतिडिकीने बोलत होती.

' अग पण शाळेत यायचं म्हणजे शाळेच्या शिस्तीप्रमाणे प्रार्थना म्हटलीच पाहिजे, असे त्या अर्थाला फाटे फोडायचे नसतात."

" मी प्रार्थना म्हन्नार नाही."

" मग चालती हो शाळेतून."

" आत्ता जात्ये !" असं म्हणून आपली फाटकी पिशवी हातात घेऊन कौसल्या तरातरा बाहेर पडली.

भर बाराचं ऊन्ह. खालचा डांबरी रस्ता तापलेला, अनवाणी पायांनी चालणाऱ्या कौसल्याचे पाय भाजत होते. कित्तीतरी दिवसांत तेल न लावल्याने केसांच्या बटा वाऱ्यावर उडत होत्या. भूक लागल्याने पावले हळूहळू पडत होती. चेहरा घामाघूम झाला होता. आणि रडायचं नाही असं तिने ठरवलं तरी तिला रडू कोसळत होतं. इवल्या कौसल्याचा शाळेतला जोर आता ओसरला होता.

"कौसल्या, ए कौशू ?" तिने आवाज ओळखला, पण मुद्दामच लक्ष दिलं नाही. तिला माहीत होतं, झाडाखाली बसून तिच्याच बरोबरीचा तिचा मानलेला भैया, चपला दुरुस्त करणारा प्रल्हाद आता विचारणार...की...

तेवढ्यात प्रल्हादने दाभण-दोरा खाली ठेवला आणि तो कौसल्याजवळ येऊन म्हणाला-

"कौसल्या ? कुठे निघालीस उन्हाची ?"

"घराला"

"आणि शाळा सुटली ?"

"न्हाई, म्यां सोडली."

"म्हंजी ?"

"म्हंजी साळंत जाणार न्हाई म्या आता."

"साळा सोडलीस तसं साळंतलं शुद बोलनं बी सोडलंस की ग ! अगदी माज्यावानी बोलतीयास !"

"मग ? तुज्यावानीच न्हाई का माजं बी !"

"न्हाय ग बया, तुला घर हाये, बा हाये. माजं कोन हाये ? न्हाई आई, न्हाई बाप-"

" का ? म्या न्हवं का तुजी भैन ? मला इसरलास ? "

" तसं न्हवं ग ! पन् ... "

" हृयो पग, वाला वरं न्हाई. म्या जात्ये घरला. तू सांजच्या ये काम जाल की. काय तरी उपाय करू वाला. "

" येतो. पन हृयो घ्ये. "

आणि प्रल्हादने एक फरसाणाचा पुडा काढला खिशातून आणि दोघांनी त्यावर ताव मारला.

पोटाला थोडासा आधार झाल्यावरोबर कौसल्या झपाझप घराकडे निघाली. तीन बाजूला पत्रे नि एकीकडे तरट लावलेली ती झोपडी. बाहेर उघडयावर केरकचरा साठलेला. कोंबडया त्या कचऱ्यातले दाणे टिपीत होत्या. सुस्तावलेली कुत्री रस्त्यातच आडवी तिडवी पडली होती. कौसल्याला मात्र स्वच्छता आवडत असे. त्यामुळे तिच्या झोपडीलगत दोन चार झाडं लावलेली होती. झोपडीच्या पत्र्याला आतल्या बाजूला दोन निसर्गदृश्यांची कॅलेंडरवरची चित्रं फाडून चिकटवलेली होती. झोपडीतला केर काढून ती स्वच्छ झाडलेली होती. भांडी पण घासलेली होती. दहा बारा वर्षांची कौसल्या घरात आई नसल्यामुळे एकाद्या बाईसारखं घर सांभाळीत असे.

" कोन त्ये ?" कौसल्याची चाहूल लागून जागा झालेला पिराजी विचारीत होता.

" म्या कौशू ! " आणि कौसल्याने पिशवी खिळयाला अडकवली.

" साळा लौकर सुटली जनू ?"

" न्हाई बा. म्या जानार न्हाई साळंत."

" अग अग ...असं काय म्हन्तेस ? तू साळा सिकून डागदरीन व्हनार आन् आपल्या झोपडपट्टीतल्या समद्यांना बरं करनार हैस न ?"

" न्हाई, त्या दुष्ट द्योवाची प्रार्थना शिकवितात त्या साळत मला जायचं न्हाई, शिकाचं न्हाई."

" पोरी, अग द्योवाला दुस्ट नग म्हनूस. पांडुरंग राखनदार हाये आपला "

" तर तर ! लई राखन करतुया. तुजा ताप हटत न्हाई, काम न्हाई, पोटात घालाया काई न्हाई. आन् म्हनं द्योव सांभाळतो.मी रागराग करत्ये त्या द्योवाचा."

" पांडुरंग...पांडुरंग..." कौसल्याचा बाप कण्हत म्हणाला. पोरीचा राग त्याला समजत होता. तिला कसं समजावून सांगावं ते कळत नव्हतं.

" बा, खीर घ्येतूस ?"

" नग...खावंच वाटंना पग..." आणि मग तिला जवळ बोलावून पिराजी म्हणाला–

" पोरी...तुजी आय मला बोलावती. म्या जातु...तू सांवाळून न्हा. पांडुरंग तुला काय बी कमी पडू द्योनार न्हाई."

" बाबा...फिरुनश्यान न्या पांडुरंगाचं नाव काडलासा तर...."

" पांडुरंग, पांडुरंग..." हा घोष आता अगदी अस्पष्ट ऐकू यायला लागला. मग बंद झाला. बाबाला झोप लागली असावी असं समजून कौसल्या जवळ गेली आणि एकदम किंचाळली–

" बाबा– – "

कौसल्याने शाळा का सोडली ते कळून घ्यायची प्रल्हादला उत्सुकता होती. तो तिच्याकडे येत होता. त्याने तिच्या दाराशी येताच ती किंकाळी ऐकली. तो तडक झोपडीत घुसला. बाबाच्या अंगावर पडून कौसल्या मुसमुसून रडत होती.

“ भैया, बाबा ग्येला, आता म्यां कशासाठी जगायचं रं! ”

“ का ? आता या भैयाला इसरली ? ”

एवढयात त्यांना बाहेर गलका ऐकू आला.

“ आग...आग... ”

झोपडपट्टीच्या टोकाला असलेल्या वाण्याच्या दुमजली दुकानाला आग लागली होती. ज्वाला चौफेर भडकल्या होत्या. दुकानांत तेल, तूप सगळेच असे पदार्थ... आग भडकायला कितीसा वेळ ? खाली दुकानदार राहायचा.

गलका ऐकू आल्याबरोबर प्रल्हाद झोपडीतून बाहेर पडून आगीच्या दिशेने निघाला. कौसल्यालाही काही सुचेना. आधीच बाबाच्या मरणाने ती गोंधळली होती. नकळत तीही प्रल्हादच्या पाठोपाठ धावली.

सगळीकडून माणसं गोळा झाली होती. आगीच्या बंबाला बोलावणं गेलं होतं. बंबवाल्यांनी शिडी लावली होती. एक बंबवाला दुकानदाराच्या बायकोला शिडीवरून घेऊन आला. आणि ती परत त्याच्या हातून सुटण्याची धडपड करीत आगीकडे धावायला लागली.

“ माझी पोरं...आत आहेत, ”

“ बाई, तुम्ही जाऊन काय करणार ? आम्ही बघतो— नाहीतर... ”

“ माझी पोरं... ” ती बाई ओरडतच होती. आणि अचानक एकादा बाण घुसावा तशी एक दहाबारा वर्षांची पोरगी परकराचा काचा मारून सुसाट धावली आणि भराभर शिडीवरून चढून खोलीत घुसली.

" कौसल्या ... कौशू ..." करीत प्रल्हादही पुढे जाऊ लागला. पण त्याला लोकांनी अडवले.

इतक्यात खिडकीत, धुराच्या वेटोळ्यात, आगीच्या लपेटीत उभी राहिलेली कौसल्या त्यांना दिसली. तिच्या हातात दुपट्यात गुंडाळलेलं काहीतरी होते.



" हे घ्या तुमचं तान्हं बाळ ! आग भडकत होती. शिडीवरून वर जाणं शक्य नव्हतं. तेवढ्यात लोकांनी एक मोठ्ठी सतरंजी

ताणून खाली धरली आणि म्हटलं, "फेक त्या बाळाला."

कौसल्याने बाळाला आलगद त्या सतरंजी झोळीत टाकलं आणि ती पुन्हा आत घुसली.

आता तिच्या दोन खाकोटीला दोन पोरं होती. एक दीड-दोन वर्षांचं आणि एक तीन-चार वर्षांचं.

तिने त्यांनाही त्या सतरंजीच्या झोळीत सोडून म्हटलं–

"बाई, एवढीच ना मुलं ?"

"होय ग. माझी बाळं ती!" आणि त्या बाईने पोरांना पोटाशी धरले.

तेवढ्यात बाळ आणखी उसासला, लोकं ओरडायला लागली, "कौसल्या, आता तू उडी टाक !"

कौसल्या उडी टाकणार तेवढ्यात ती दाराची सबंध चौकट आगीच्या ज्वाळांनी वेढून टाकली. कौसल्याने डोळ्यांवर हात धरले होते. एकदम कडकडकडाट आवाज झाला आणि त्या पेटत्या दाराच्या चौकटीसकट कौसल्या खाली कोसळली.

अग्निशामक दलांच्या लोकांनी मोठ्या शिताफीने तिला त्या आगीतून दूर केलं. आगीची आच लागून तिचे हातपाय, तोंड लाल झाले होते. चेहराही लालबुंद झाला होता. ठिकठिकाणी पण थोडंथोड भाजलं होतं. तिला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये नेलं. वाटेतच ती बेशुद्ध झाली होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी ती शुद्धीवर आली तेव्हा प्रल्हाद तिच्या बिछान्याजवळ बसला होता. तिची चुळबुळ पाहून प्रल्हादने हाक मारली.

"कौसल्या...कौशू..."

"कोण ?"

"अग मी भैया, भैया ! प्रल्हाद..बघ ना इकडे वरं वाटतं ना ?"

आणि त्याला आपली चूक कळून आली.

"अरे पण मला ..मला...दिसत नाही." आणि ती रडू लागली.

प्रल्हादने एकदम जवळ जाऊन तिचे हात धरले. तिच्या केसांवरून हात फिरवीत तो म्हणाला, "कौशू, माझ्या भैने, क्येवडा पराक्रम क्येलास तू ! तुज्या दोन डोळ्यांच्या वदल्यात तू त्या आयेला तिची तीन जित्ती जागती प्वारं दिलीस. लोग काय म्हनत हुतं म्हाईत हाये ? "

"काय ?"

"म्हन्ले, द्योवानंच या प्वारीला इक्ती चांगली बुद्धी दिली. त्यानेच राखलं पन तिला जाळातून."

"खरं सांगतूयास ? द्योवानं राखलं ?"

"न्हाई तर ?"

"कौशू, आता रडाभेकायचं काम न्हाई. आता जलमभर म्या तुजं डोळं. डोळं न्हाईत म्हून दुसरे क्काय येनार न्हाय काय तुला ? अग म्या हाय तर तुला कसली चिंता पडायचं काई कारण न्हाई. मला कोन न्हवतंच. आता तुला बी कोन न्हाई. पन आपुन दोगं योकमेकांना हाये का न्हाई...आं ?"

"न्हाई कसं ? हाये तर ! परल्हाद भैया, मला सांग रे... दीस उगवलाय का ?"

"व्हय तर ! सर्जा उगावलाय... उन्ह पडलंया... हास्पिटलातल्या त्या गुलमोहराच्या झाडाला लाल लाल कुंकवावानी फुलं लागल्यातं... आन्खी तो चाफा हाये ना..."

* *

## जिथे नैराश्य आलस्य
## प्रकाशा तेथ नव न्यावे ।

" शंकर, अरे शंकऱ्या, ऊठ, ऊठ ! बघ दीस किती वर आलाय !"

शंकरची आई त्याला उठवीत होती. पण शंकर कसला ! मुलखाचा झोपाळू. उठण्याचं नाव नाही.

" अरे शंकर, मासे धरूक नाय जायाचो ?" आई रागावून म्हणाली.

तरी शंकर तसाच झोपलेला. मग मात्र आई फारच रागावली. तिने खसकन त्याच्या डोक्यावरची घोंगडी बाजूला केली, त्याला हात धरून उठवला आणि गदागदा हालवीत म्हणाली, " चांगलं शंकर नाव ठेवलां तां सोभता नाय तुकां ! तां खरा पेंग्याच असां !"

आता मात्र पेंग्या उठला. उठला तो पेंगत पेंगतच. पण जागा झाला. तसा पेंग्या चांगला मुलगा होता. पण फार आळशी, आणि झोपाळू, एकदा झोपला की झोपलाच. मग कितीही हाका मारा, याची झोप उडायची नाही.

बाप समुद्रात मासेमारीला गेला आणि त्याला समुद्राने गिळून

टाकला. बाप होता तोवर मासे आणायचा, छान कालवण व्हायचं. पेंग्याची आई सुकड वाळवायची. मासे विकायची. पण घर कसं चांगलं चाललं होतं.

पण बाप गेला. त्याच्याबरोबर घराचं सुख पण गेलं. राहृयलं फक्त त्याचं मासे पकडायचं जाळं.

पेंग्या आता चौदा वर्षांचा झाला होता. त्याच्या आईला वाटे आता त्याने बापाचा धंदा पुढे चालवावा. आई मासे धरायला जा म्हणाली की ह्याचं उत्तर तयार !

" मासे धरूंक जाव तर साळंचो काय ?"

मग आई चिडे. म्हणे, " साळंचो काय ?" कारण शाळा असे दुपारी बारा वाजता. पेंग्या सकाळी दिवस उजाडताच जर जवळच्या खाडीवर गेला तर त्याला मासे मिळतील आणि परत येऊन सगळं आटोपून शाळेतही जाता येईल, हे आईला ठाऊक होतं. पण पेंग्याचं पेंगणं संपेल तेव्हा ना !

पण आज मात्र पेंग्याला आईने ढकललंच घराबाहेर. कारण गेले दोन दिवस घरात खायला काहीच नव्हतं.

पेंग्याने तोंडावर गार पाण्याचे सपकारे मारले. झोप उडवली आणि जाळं खांद्यावर टाकून तो खाडीवर निघाला.

कोवळं कोवळं ऊन्ह उघड्या पाठीवर छान छान लागत होतं. पेंग्या इतक्या लौकर कधीच उठला नव्हता. आज त्याला सगळं नवं नवं वाटत होतं. माड-पोफळीची झाडं कशी ताठ उभी होती. त्यांचे शेंडे जणू काही आकाशाला टेकल्यासारखे दिसत होते. माडी साठवायची मडकी माडाच्या झाडांवर लटकलेली होती. कुणी कुणी माडकरी झाडांवर चढून झाडाच्या बुंध्यांना खाप्या

पाडीत होते. त्यांच्या कोयत्या उन्हात कशा लखलख करीत होत्या. पेंग्या चालता चालता थांबून त्या चकाकत्या कोयत्यांकडे पाह्यत राहायचा.

बघता बघता एकदम त्याला आठवलं, "बाबा असाच झाडावर चढायचा. आपल्याला कितीदा तरी म्हणाला होता चल, "मी तुला खापी पाडायला शिकवतो." पण आपण गेलोच नाही. इतक्या सकाळी उठून जायचं जिवावरच येई आपल्या. बाबांबरोबर गेलो असतो, खापी पाडायला शिकलो असतो तर एव्हाना थोडे पैसे मिळवायला लागलो असतो.

विचार करता करता त्याला त्या दिवशीची आठवण झाली.

"आई, आये ! भूक लागली. "त्याची धाकटी बहीण रडत होती.

"थांब हो !" असं म्हणून त्याची आई खोपटात गाडगी मडकी शोधू लागली. पण घरात काहीच नव्हतं. नाही वरी, नाचणी, नाहीत कण्या. बहीण सारखी रडत होती. हातपाय आपटीत होती.

आईने आपल्याला उठवलं आणि मासे धरून आणायला सांगितलं. पण आपण डोक्यावर जास्तच घट्ट घोंगडी पांघरून झोपलो. अर्धवट झोपेत घरात काय चाललंय ते कळत होतं, पण लगेच उठावं आणि जावं असं काही वाटलं नाही आपल्याला.

"आये, खायला दे." बहिणीची पिरपीर ऐकून आई चिडली आणि म्हणाली, "खां माकां !"

भुकेने वखवखलेल्या बहिणीने खरोखरीच आईच्या हाताचं बोट करकरून चावलं. आई किंचाळली. तिने बोट सोडवून घेतलं.

बहिणीच्या पाठीत जोराचा धपाटा घातला. मग बहीण जोरजोरात रडायला लागली. पण तेवढ्यात आईच्या बोटातनं येणारं रक्त तिला दिसलं. तिने आपल्या परकराचीच धांदोटी फाडली आणि आईच्या बोटाला ती चिंधी बांधली. मग ती आईच्या गळ्यात पडून ओक्साबोक्शी रडायला लागली. आई तिच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाली, " गप, गप, रडू नाय. तुजा भाव त्यो शंकऱ्या नालायक असां. तुका उपास पडता..." आणि नंतर आई तिला कितीतरी वेळ समजावीत होती.

आत्ता हे सगळं आठवून त्याला स्वतःचीच लाज वाटली. तो स्वतःच्या झोपेवर चिडला. आळशीपणावर चिडला. आपल्यामुळे आईला नि वहिणीला उपाशी राहावं लागतं. छेः आता असं नाही करायचं !"

मनाशी असं ठरवीतच तो चालला होता. आता गाव संपून तो खाडीच्या किनाऱ्यावर आला. दवाने ओली झालेली वाळू पायाला छान गारगार लागत होती. कोवळ्या उन्हात चमचमत होती. त्याने थोडी वाळू हातात घेतली, बोटांमधून सोडली. त्याला खूप मजा वाटली.

" पेंग्या...ए पेंग्या..."

कुणाची तरी हाक ऐकू आली. पेंग्याने वळून पाहिलं. त्याच्याच वर्गातला नारायण आणि बाबू, खाडीत पोहत होते.

" बाप रे ! इतक्या सकाळी उठून हे पोहायला आलेत !" पेंग्या मनात म्हणाला.

" पेंग्या, अरे इतक्या लौकर कसा उठलास ?" बाबूने विचारलं.

" अरे तो झोपेतच आला असेल चुकून." नारायणाने चिडवलं.

"छट् ! मी आज लौकर उठून मासे पकडायला आलो आहे."

"काय ? मासे पकडायला ?" बाबू जोरजोरात हसू लागला.

"का ? हसतोस का ?"

"अरे हसू नको तर काय करू ? तू मासे पकडायसाठी जाळं लावून बसशील आणि एकादा देवमासा येऊन तुला जाळ्यासकट घेऊन गेला ओढून तरी कळायचं नाही."

"हो ना !" नारायण बाबूची री ओढत म्हणाला. "जाळं टाकून तू बसलास की लागशील पेंगायला. मग झोपशील आणि झोपेतच जाशील खाडीच्या तळाशी."

"तर काय ! मुलखाचा आळशी तू. पेंग्या आळशी जाणार तळाशी !"

असं म्हणून दोघं त्याला चिडवायला लागले. पेंग्याला खूप राग आला पण खरंच होतं ते. तो जाळं लावून बसायचा नि झोप यायची त्याला. आणि मग जाळं वर ओढायच्या आधीच धडपडून जाळ्यातले मासे पुन्हा पळून जात.

आज मात्र त्याने झोपेवर मात करायची असं ठरवलं होतं. त्याने एक खडक हेरला आणि त्यावर बसून त्याने पाण्यात जाळं फेकलं. बाबू आणि नारायण यांचंही पोहणं संपलं होतं. तेही अंग पुसून कोरडे कपडे घालून त्याच्या जवळ येऊन बसले. तिघांच्या गप्पा सुरू झाल्या.

समोर सिंधुदुर्ग दिसत होता. शिवाजी महाराजांनी मोठ्या जिद्दीने आणि कल्पकतेने बांधलेला हा समुद्रातला किल्ला. जंजिरा ! मुलांनी इतिहासात वाचलं होतं. त्यांना सगळं आठवत होतं.

" खरंच पेंग्या, आज तू आला आहेस त्याचं आश्चर्यच वाटतंय ! "

" अरे, आज आईने जवळजवळ मारून हाकललंच मला. गेले दोन दिवस घरात काहीच नव्हतं. " पेंग्या पटकन बोलून गेला.

" बापरे ! पेंग्या, म्हंजे तू मासे नेले नाहीत तर घरात काहीच नसतं ? " बाबूने आश्चर्याने विचारलं.

" अरे कुठून असणार ? त्याचे वडील होते तेव्हा ठीक होतं. पण आता हाच घरात मोठा आणि ..." बोलता बोलता नारायण थांबला. पेंग्याचा हुंदका त्याला ऐकू आला.

" पेंग्या -- काय झालं रे ? " बाबूने प्रेमाने विचारलं. एरवी चिडवणाऱ्या या मित्राने विचारलेल्या आपुलकीच्या प्रश्नाने पेंग्याला भडभडून आलं. तो म्हणाला, " बाबू, समोरचा सिंधुदुर्ग पाह्यला आणि मला माझाच राग आला. आईची आठवण येऊन रडू आलं "

" अरे पण का ? "

" शिवाजी महाराजांना जिजामातेने सांगितलं आणि त्यांनी स्वराज्य स्थापलं. मला आई नुसते मासे पकडायला सांगते तर मी आळशी -- मी - मी - "

नारायण आता पेंग्याच्या खांद्यावर थोपटीत म्हणाला, " पेंग्या, तुझ्या या आळशीपणावर आणि झोपेवर आम्ही उपाय शोधलाय."

" कोणता ? " पेंग्याने उत्सुकतेने विचारलं.

" हे बघ, आम्ही रोज सकाळी खाडीवर पोहायला येतो. जरा वाकडी वाट करून तुझ्या घरावरून येऊ. तुला हाक मारू. तीन

हाकांमधे उठून तू आला नाहीस तर आम्ही चालायला लागू आहे कबूल ? "

" हो, हो, कबूल. " पेंग्या उत्साहाने म्हणाला.

बाबू नि नारायण निघून गेले. पेंग्या जाळं टाकून बसला. ऊन्ह तापायला लागलं. बराच उशीर झाला तेव्हा पेंग्याने जाळं ओढून घेतलं. आठदहा लहान मासेच तेवढे जाळ्यात आले होते. पण तेवढेदेखील पेंग्याला खूप वाटले. त्याने मासे टोपलीत टाकले. वर जाळं पसरलं आणि धावत पळत घरी आला. आल्या आल्या आईपुढे टोपली ठेवीत म्हणाला–

" इवलासा मासा, टिवलासा मासा, कालवण कर, सांबार कर. "

आई त्याच्याकडे पाहातच राहिली. आई सैंपाकाला लागली, पण शाळेची वेळ झाली म्हणून पेंग्या तसाच न जेवता फक्त आईने दिलेली पेज पिऊन शाळेत गेला.

" पेंग्या ... ए पेंग्या ... " सकाळी सकाळी कोण आलं म्हणून आई बघते तर बाबू नि नारायण.

" काय जालं रं पोरानूं ? " तिने विचारलं.

" काही नाही, पेंग्याला खाडीवर न्यायला आलोय. "

" तो झोपलाय. थांबा, उठवते. "

" उठवू नका. आमच्या तीन हाकांनी तो उठायला हवा. " आणि बाबूने पुन्हा तीनदा हाका मारल्या. पण पेंग्याला त्या कुठल्या झोपेत ऐकायला जायला ? बाबू-नारायण निघून गेले.

मग शाळेत गेल्यावर बाबू नि नारायण दोघांना तोंड दाखवायची त्याला लाज वाटू लागली. पण त्या दोघांनी त्याला गाटलंच. बाबू म्हणाला–

" पेंग्या, आता उद्या मात्र आमची खेप फुकट घालवू नकोस हं ! "

" तर काय ! मासे धरायला जायचं नाही. मग उपास. नंतर स्वत:वरच चिडून म्हणायचं, ' माझं असंच. ' आणि उदास व्हायचं. निराश व्हायचं. हो ना पेंग्या ? " नारायण म्हणाला.

" नाही रे, उद्या नक्की येईल. " पेंग्याने मनाशी निश्चयच केला.

आणि दुसऱ्या दिवशी सकाळी खरोखरीच मित्रांच्या तिसऱ्या हाकेला पेंग्या जागा झाला. जाळं खांद्यावर टाकून बाहेर पडला. आई आश्चर्याने पाहातच राहिली, मग हे रोजचंच झालं. पेंग्या जात होता. मासे मिळत होते.

आजही पेंग्या, बाबू, नारायण मजेत गप्पा मारीत खाडीवर गेले. बाबू नि नारायण पोहायला लागले. पेंग्या थोडा वेळ पाण्यात डुंबला व लगेच वर येऊन, कपडे बदलून, जाळं टाकून खडकावर बसला. एकीकडे गप्पा चालूच होत्या. बाबू नि नारायण पोहून परत गेले पेंग्या आज स्वत:शीच विचार करीत बसला. होता. बऱ्याच वेळाने त्याने जाळं हालवून पाहिलं. जड लागत होतं.

" बाप रे. देवमासा तर नाही अडकला ? की तो एका कोळ्याला सापडलेला जादूचा मासा ? इच्छा सांगितली की तृप्त करणारा ? खरच. मला जर का असा मासा मिळाला– छे:, पण नकोच तसं. मास्तर म्हणतात, माणसाने आपल्या प्रयत्नाने मिळवावं. असं जादूने आयतं मिळणं – – आणि जादू तरी खरी कुठे असते – – "

पेंग्या विचारात गुंगला होता, आणि जाळं खेचता खेचता

एकदम दचकला. आज बरेच मासे मिळाले होते. पण जाळ्यात माशांबरोबरच आणखी काहीतरी दिसत होतं.

त्याने जाळं पुरतं वर खेचून घेतलं. मासे जाळ्यातून काढून टोपलीत टाकले. व तो जाळ्याकडे पाहू लागला. त्यातली वस्तू त्याने हळूच, जाळं फाटणार नाही अशा हलक्या हाताने काढून घेतली.



ती एक चामड्याची थैली होती. पण रिकामी असावी. कारण खूपच हलकी लागत होती.

“ काय असावं थैलीत ? कुणाची असावी ? कुणा चोरटचाने टाकलेली तर नसेल ? पण रिकामी दिसतेय ! चोर कधी . . . आपण घ्यावी का ? – – ”

मनात असा विचार करीतच पेंग्याने ती थैलीही टोपलीत टाकली. वर जाळ पसरलं आणि घरी जाऊन काय ते बघावं असं ठरवून तो घरच्या वाटेला लागला.

“ आई हे घे मासे. ” टोपलीतली थैली बाजूला काढून ठेवीत पेंग्याने टोपली आईजवळ दिली. आळशी पोरगा मार्गाला लागलेला पाहून आई खूष होती. बाबूला नि नारायणला दुवा देत होती. त्यांच्यामुळेच पेंग्या रोज लौकर उठून मासे धरायला जाऊ लागला होता. उपास संपले होते. निराशा, दारिद्रय 'यांनी काढता पाय घ्यायला सुरुवात केली होती. खाऊन उरलेले मासे सुकवणं जमत होते. ते विकून पैसे येत होते. ती मोठ्या कौतुकानें पेंग्याकडे बघत होती. एवढ्यात...

“ आये...आये...मी खाडीवर जातो...” असं म्हणत पेंग्या उठला.

“ आरं पन्...आणि ती थैली खंय मिळाली तुका ?” त्याच्या हातातल्या थैलीकडे पाहात आईने विचारलं.

“ मग सांगतो...ही थैली...” आणि तो तसाच हातात थैली गच्च पकडून घराबाहेर पडला.

पेंग्या तसाच खाडीकडे धावत सुटला. ती थैली पाहून आणि तिच्यावरचं नाव वाचून त्याला काहीतरी समजलं होतं.

पेंग्या सरळ खाडीवर गेला. त्याने जिथे जाळ टाकलं होतं त्या

खडकावर जाऊन उभा राहिला आणि क्षणभर पाण्याकडे टक लावून पाहात त्याने धाडकन त्या पाण्यात उडी टाकली.

कितीतरी वेळ तो पाण्यात होता. पाण्याच्या तळाशी काहीतरी धुंडत होता. मधुनच पाण्यावर येऊन तरंगे. पुन्हा आत जाई. जवळजवळ तीन-चार तासांनी तो पुन्हा वर आला. हातात थैली होतीच. ती घेऊनच तो खडकापाशी आला.

आता त्याच्या हातातली थैली आधीच्यासारखी रिकामी नव्हती. ती भरलेली होती.. पेंग्या घरच्या वाटेला लागला. दुपारचं कडक ऊन्ह लागत होतं. पेंग्या घामाच्या धारांनी निथळत होता. पण त्याला त्याचं काही नव्हतं. हातातली थैली पोटाशी धरीत, मधूनच ती चाचपत तो घरी निघाला होता.

झोपडीच्या दाराशी येऊन तो गपकन खाली बसला. पार थकून गेला होता तो. तीन-चार तास अपार श्रम झाले होते. पण त्याच्या हाती लागलेल्या वस्तूमुळे तो खूष झाला होता. थोडा वेळ तो स्तब्ध बसला होता.

...आणि मग एकदम सुसाट पळत सुटला.

" मास्तर...मास्तर..." धापा टाकीत आलेल्या पेंग्याकडे मास्तर आश्चर्याने पाहू लागले.

" मास्तर ही थैली .." त्यांच्यापुढे थैली धरीत पेंग्या म्हणाला.

" कसली थैली ? " मास्तरांनी विचारलं.

" मास्तर, माझ्या मासेमारीच्या जाळ्यात आज ही थैली गावली. मला वाटलं, एकाद्या चोरानं टाकली असेल. मी घरी जाऊन पाह्यलं. रिकामी होती. हिच्यावर हये नाव आहे बघा विणलेलं--चामड्यात आहे ..संतुबा शेणवी...आणि मग माज्या

मनात आलं नि खाडीच्या तळात धुंडलं. तेव्हा गावल्या या मोहरा. मास्तर तुम्ही इतिहासाच्या तासाला सांगितलं वतं ना... या वेंगुर्ल्याच्या खाडीत शिवाजी महाराजांनी मोगलांना सामील असलेल्या व्यापाऱ्यांची जहाजं लुटली होती? तेव्हा संतुबा शेणवीचं नाव सांगितलं होतं तुम्ही. मला एकदम आठवलं ते. त्या जहाजावरचीच थैली असेल ही संतुबा शेणवीची. आज अचानक माझ्या जाळ्यात गवसली." पेंग्या एका दमात बोलत होता. त्याने सगळा पराक्रम मास्तरांना सांगितला. आपल्याला मिळालेल्या थैलीमुळे आणि नंतर लागलेल्या मोहरांच्या शोधामुळे तो आश्चर्यचकित झाला होता. आनंदाने मोहरला होता.

मास्तरांनी त्याच्या हातातली थैली घेतली. नीट निरखून बघितली. पेंग्या सांगत होता ते खरंच होतं. ती थैली संतुबा शेणवीची होती. पेंग्याने त्या मोहरा खाडीच्या तळाशी चार तास धुंडून मिळवल्या होत्या. इतकी वर्ष खाडीच्या तळाशी दडून राहिलेली थैली नि मोहरा अशा नेमक्या मिळाल्या होत्या. सहज नव्हे तर पेंग्याने कष्टाने मिळवल्या होत्या.

मास्तरांना आपण शिकवलेला इतिहास आठवला. त्यांनी थैली ठेवून घेतली. गावात एक इतिहासतज्ज्ञ होते त्यांच्याकडे ती तपासणीसाठी पाठवली. खरोखरीच ती थैली ऐतिहासिक होती.

आळशी पेंग्याने फार मोठा उपयुक्त ऐतिहासिक शोध लावला होता. पेंग्याचं गावभर नाव झालं होतं. सगळे त्याच्या हुशारीचं आणि धाडसाचं कौतुक करीत होते.

पण पेंग्या मात्र आपल्या दोघा मित्रांना श्रेय देत म्हणत होता, "बाबू आणि नारायण दोघांनी माझा आळस घालवला नसता...

...मला सकाळी उठवलं नसतं, तर माझ्या घरात नेहमीचं उपास-मार राहिली असती. जन्मभर निराशाच पदरी पडली असती. कारण नाहीतर मला ही थैली तरी कशी सापडली असती ? ..."

बाबूला नि नारायणाला मात्र आपण काही जे विशेष केलं ते समजलंच नव्हतं. समजलं होतं ते मास्तरांना.

आपण या मुलांना नेहमी प्रार्थना शिकवतो ती मनावर ठसन त्यांनी प्रार्थनेतले शब्द अजाणता का होईना खरे केले होते.

मास्तरांच्या डोळ्यांसमोर शाळेचं मैदान दिसू लागलं. अगदी मन लावून प्रार्थना म्हणणारी मुलं, विशेषतः, बाबू नि नारायण त्यांच्या डोळ्यांसमोर उभे राहिले. प्रार्थनेचे शब्द त्यांच्या कानात घुमू लागले --

" जिथे नैराश्य आलस्य
प्रकाशा तेथ नव न्यावे -- "

मुलांनी खरंच पेंग्याच्या घरात नवा प्रकाश नेला होता. घरा-तच नव्हे तर पेंग्याच्या आळशी आणि निराश मनात सुद्धा !

* *

**असे जे वित्त वा विद्या**
**सदा ते देतची जावे ।**

---

" आरं...आरं...कोंवडी पळवली पग त्या कुत्र्यानं ! "

" लई माजलीत कुत्तरडी! रोज योक दोन कोंवडचा नेत्यातच! "

" अवं कोंवडीच काय पन् परवा दिशी त्या सोनूच्या घरचं करडू बी न्ह्येलं की ! "

" अक्षी फाडूनश्यान खात्यात. धा-बारा कुत्र्यांचं टोळकंच हाय म्हनं. येत्यात, झुंडपना करूनश्यान कुनी तरी कोंबडं, करडू गावंल ते पकडत्यात आन् वढीत नेऊन दूर कुठंतरी फाडून खात्यात ! "

" त्येस्नी मारनारा बी कोन भ्येटत न्हाई."

" योक डाव पिसाळली तर मंग जालंच की ! प्वाराबाळांना धास्तीच त्येंची "

गावात कुत्र्यांचा फारच कहार झाला होता. पाच-सहा भटकी कुत्री गावावाहेर दूर कुठेतरी जमत, एकदम कोंवड्या–करडांवर हल्ला चढवीत आणि त्याला ओढून नेऊन दूर त्याचा फडशा पाडीत. चांगली गलेलठ्ठ झाली होती. इतक्या भर्रकन यायची नि जायची को गावकऱ्यांनी पकडावं म्हटलं तरी हाती लागत नसंत. सगळे गावकरी अगदी वैतागले होते.

" लक्ष्यां, पग रं कंची कोंबडी न्येली धरून ?"

बापाच्या सांगण्याबरोबर लक्ष्मण खळ्यात जाऊन पाहू लागला. त्याने कोंबड्या मोजल्या आणि एकदम ओरडला–

" बाबा, पांढरी कोंबडी नेलेली दिसतेय आणि...बाप रे ... अहो बाबा, कोंबडा पण दिसत नाही !"

" आरं असंल खळ्याभाईर कुटं तरी. न्हाईतर त्या वारुळा-मागे बसतो जाऊनश्यान. थतं पग धुंडून !"

लक्ष्मणने सगळ्याभर शोधलं. पण त्याला कोंबडा कुठेही सापडला नाही. तेव्हा पांढरी कोंबडी आणि कोंबडा दोघांनाही कुत्र्यांनी पकडलं हे सिद्धच झालं.

" कोंबडा पन् गावत न्हाई म्हंतोस ? मंजी आता आली का पंचाईत या कोंबड्यांची ? आरं आपला धंदाच बसल की अंड्यापिलांचा ! दुसरा कोंबडा कसा घ्येनार ? कोंबडे लई म्हाग जालेत !"

" बाबा, मला वाटतं, त्या कुत्र्यांचा एकदा नायनाट करायलाच हवा आज तिकडेच जाईन. मी माझ्या सात-आठ दोस्तांना गोळा करतो. पक्के फास करतो दोरीचे आणि चांगले आवळतो त्या कुतरड्यांच्या मानेभोवती."

लक्ष्मण दातओठ खात बोलत होता. त्याला त्या कुत्र्यांचा खरोखरीच फार राग आला होता. कर्जापोटी बापाचं सगळं शेत विकलं गेलं होतं. आई नि बाप दोघंही लोकांच्या शेतावर मजुरी करायचे. कसेबसे दिवस ढकलीत होते. पण त्यांनी पंधरा-वीस कोंबड्याही पाळल्या होत्या. त्या कोंबड्यांची अंडी, पिल्लं विकून थोडे पैसे येत. त्यावरच लक्ष्मणच्या शाळेची फी सुटत होती.

कोंबड्या जाणं म्हणजे शाळा बंद होण्याची धास्तीच. कारण त्याच्या आई-वडिलांची मजुरी घरखर्चालाच होत असे. तोच जास्त वेळ देत असे या कोंबड्यांच्या राखणीसाठी. त्याला त्याची गरजही होती नि आवडही होती. त्यामुळे आज त्याला फारच राग आला होता त्या कुत्र्यांचा.

" बंट्या... ए बंट्या..."

" काय रं लक्ष्या ? आज तू घरी कसा ? साळा न्हाय का ?"

" अरे शाळा आहे. पण मी जाणार नाही."

" का रं ? मास्तरांनी घरी बशिवलं की काय ?"

" नाही रे. पण बसवतील फी नाही दिली तर ! त्यासाठीच तर तुला हाक मारली."

" काय येडं की खुळं ? आरं म्या कुटून घेनार तुला पैसं ? माज्याजवळ असत्यें तर म्या पन नसतो ग्येलो साळंत ? आमी आपल्ये मेंढ्याच राखनार."

" तसं नाही ह ! पुढच्या वर्षी मी तुला पण नेणार आहे शाळेत ओढून. आता तुला पुष्कळ अक्षरओळख झालीय. पुस्तक वाचतोस ना मी शिकवलेलं ?"

" वाचतो तर. त्ये न्हाऊं द्ये. पन कशासाठी हाकारलंस त्ये तर सांग."

" हां ! अरे आज त्या कुत्र्यांनी आमची पांढरी कोंबडी नि कोंबडा पण लंपास केला. आज त्या कुत्र्यांना आपण पकडायचं."

" हां ! पकडायाच होवं. परवादिशी ग्येनूचं कोकरू पळिवलं न्हाई त्येनी ?"

" चल मग, सगळ्यांनाच बोलवू या."

मग ग्येनू, बंट्या, येशा, सुकऱ्या, दन्या, भिऱ्या, शिवा आणि लक्ष्मण सगळे घराबाहेर पडले. येशाच्या वडिलांनी त्यांना चांगले भक्कम दोर दिले. जाता जाता या मुलांनी त्याचे फास बनवले आणि सगळीजणं कुत्र्यांच्या मागावर निघाली. एखाद्या वाघा-बिघाच्या शिकारीवर निघाल्यासारखा उत्साह संचरला होता सर्वांच्या अंगात.

येशानं आपलं एक छोटं कोकरू बरोबर घेतलं होते. त्या सगळ्या कुत्र्यांची लपायची जागा मुलांना माहीत होती. महादेवाच्या शेतापलीकडे एक टेकाड होतं. त्याच्या बाजूला सगळी कुत्री टोळकं करून बसायची

मुलांनी कोकरू पुढे सोडलं. ते बें... बें... करीत धावत सुटलं. कुत्री भो भो... करून कालवा करायला लागली. ती टेकडाच्या डाव्या अंगाला. आणि आता मुलं उजव्या अंगाला जाऊन उभी राहिली.

कोकरू दिसल्याबरोबर सगळी कुत्री जशी ठरवल्यासारखी पुढे यायला लागली. त्यांचं भुंकणं ऐकून कोकरू घाबरलं. सैरावैरा वेडंवाकडं पळू लागलं. साहजिकच ती पाच-सहा कुत्री पण त्या कोकराच्या मागे धावायला लागली. कोंडी करायची आणि त्या कोंडाळ्यात कोकराला नाहीतर डुकराला पकडायचं ही त्यांची पद्धत तेव्हा कोकराला मध्ये अडकवून ती कोंडाळं करायला लागल्याबरोबर या पोरांनी अगदी नेम धरून भराभर एकेकाच्या गळ्यात फास अडकवले. कुत्र्यांना या मुलांची वेगळी चाहूल लागली नव्हती. तशी गुराख्यांची मुलं नेहमीच भटकत. त्यामुळं आज तीच आलीत आणि त्यांचंच एक कोकरू आपल्याला मिळणार अशी त्यांची कल्पना होती.

पण अचानक सर्वांच्या गळ्यांभोवती फास अडकले. एखाद्या माळेत मणी ओवावे तशी सहा कुत्र्यांची डोकी फासांच्या माळेत अडकली. जिवाच्या कहाराने ती भुंकू लागली. पण गळेच अडकल्याने त्यांना काही करता येईना.

आता कुत्री चावायचीही भीती नव्हती. तेव्हा मुलांनी त्यांना दोरीने फरफटत गावात आणलं. कुत्री पकडल्याचं पाहून गावकऱ्यांना फारच बरं वाटलं.

" येशा, जा पोलीस पाटलाला बोलावून आण. त्याच्या ताब्यात देवून टाकू. न्हेतील आन आडकवत्याल पांजारपोळात."

येशा नि बंटचा धावतच गेले. पोलीस पाटलालाही मुलांचं कौतुक वाटलं. इतके दिवस आपल्याला हे का सुचलं नाही याचं सर्वांनाच आश्चर्य वाटत होतं.

पोलीस पाटलाच्या मागोमाग ही सगळी कुत्र्यांची वरात घेऊन मुलं ऐटीत चालली होती. लक्ष्मणच्या डोक्यावरचं एक फार मोठं ओझं उतरलं होतं. कारण एकदा का त्या कुत्र्यांना त्याच्या खळ्याची चटक लागली असती तर त्याच्या कोंबड्या भराभर नाहीशा झाल्या असत्या. आणि मग शाळा – –.

" लक्ष्मण, अरे काल शाळेत आला नाहीस ! तुझी खूप वाट पाहिली.".

" का रे ? "

" अरे आपल्या वर्गात एक नवा मुलगा आलाय पंकज नावाचा. लांब तिकडे आबूधाबीला होता. त्याच्या वडिलांची इकडे बदली झालीय. खूप श्रीमंत आहे बघ." सतीश सांगत होता.

" मग नक्कीच त्याची ओळख करून देऊस माझ्याशी."

" का ? "

" अरे मी असा खेड्यातला. शिवाय कोंबड्या पाळून त्यावर शिकणारा. माझ्याशी तो बोलायचा पण नाही. आणि मग मला जर का अपमान वाटला, तर – – " लक्ष्मण म्हणाला.

' तुझं डोकं तडकेल हे ठाऊक आहे मला. पण हा मुलगा खरंच फार चांगला वाटला. काल इतकी छान आपणहून सर्वांची ओळख करून घेतलीन. "

" तरी पण – – "

" अरे तो बघ, ए पंकज – – "

" कोण सतीश ? आणि हा कोण ? हाच का लक्ष्मण ? काल आला नाही म्हणून तू काळजीत होतास, तो ? " पंकजने आल्या आल्या विचारलं.

" मला कसं ओळखलंस ? खेडवळ दिसतो म्हणून ? की गरिबी दिसतेय तोंडावर माझी ? " लक्ष्मण तुटकपणेच म्हणाला.

" अरे असं काय बोलतोस ? काल सगळी मुलं आली होती. तूच तेवढा नव्हतास असं हा सतीश म्हणाला. त्यावरून तर्क केला मी. काल का नव्हता आलास ? बरं नव्हतं ? "

पंकजचा बोलण्याचा सूर, त्यातला आपलेपणा यामुळे लक्ष्मणचा उगीचचा राग केव्हाच ओसरला. त्याने कालची सगळी हकीकत सविस्तरपणे सांगितली.

" वा: ! छानच पराक्रम गाजवलात की ! पण काय रे, तू गावाहून शाळेत कसा येतोस ? "

" अरे गावापासून मैलभर येतो चालत. तिथे बसस्टॉप आहे. तिथून पुढे बसने "

तेवढ्यात शाळची घंटा झाली आणि त्यांच्या गप्पा तशाच राहिल्या.

नंतरच्या दहा बारा दिवसांत पंकजची आणि सगळ्याच मुलांची खूप दोस्ती जमली. सुरवातीला त्याच्यापासून दूर दूर राहू पाहणारा लक्ष्मणही आता त्याचा मित्र बनला.

" काय रे लक्ष्मण, तुम्ही कोंबड्या कुठे ठेवता ? " पंकजने एक दिवस विचारलं.

" कुठे म्हंजे ? खळ्यावर. "

" आणि खातात काय ? "

" काय तरी विचारणं तुझं ! अरे, सकाळ संध्याकाळ काही-तरी दाणे टाकायचे. ते खातात, अंडी देतात. त्या अंड्यांवरच तर चाललंय आमचं. आता कालच बघ, दहा कोंवड्यांचा खोप पुरा झाला ! आता सगळ्या खुडूक झाल्यात कालपासून. " लक्ष्मण उत्साहाने सांगत होता.

" ए, मला ओ की ठो कळलं नाही तू काय सांगितलंस त्यातलं. " सतीश म्हणाला.

" पण मला कळलं. " पंकज म्हणाला.

" तुला ? "

" हो. अरे, कोंबडी पंधरावीस दिवस सतत अंडी घालते त्याला म्हणतात खोप. तो पुरा झाला की ती अंडी उबवायला बसते. मग म्हणायच, कोंवडी खुडूक झाली. काय छान कुर्रर, कुर्रर आवाज काढते, नाही लक्ष्मण ?" पंकजचं बोलणं ऐकून लक्ष्मणही चकित झाला.

" अरे तुला -- "

" हे बघ, माझ्या बाबांनी आबुधाबीहून इकडे आल्यावर एक पोल्ट्री काढलीय. मी सुट्टीच्या दिवशी जातो मला सगळी माहिती करून देतात ते."

आता तर पंकजची आणि लक्ष्मणची जास्तच दोस्ती जमली. पंकज त्याला सुट्टीच्या वेळात काय काय माहिती द्यायचा.

" अरे लक्ष्मण, नुसते दाणे कशाला घालायचे कोंवडीला ? "

" मग काय घालायचं ? "

" अरे काहीही ! किडे, मुंग्या, गिरणीतलं खाली पडलेलं पीठ, वाया जाणारी भाजीपाला, चोथा, गवत – – अरे काहीही खाऊन उत्कृष्ट अंडी देणारी फॅक्टरी आहे कोंवडी म्हणजे."

" ए, तुझ्या बाबांच्या पोल्ट्रीत अंडी टिकवतात कशी रे ? माझ्या कोंवडयांनी परवा अंडी खूप दिली. पण सगळी काही विकली नाही गेली. कितीतरी नासली."

" आमच्याकडे यंत्रामधे टिकवतात." पंकजने सांगितले.

" मग काय उपयोग ? "

" का ? अरे, साधा उपाय आहे की. "

" कसला ? "

" अंडी टिकवण्याचा ! "

" खरंच ? सांग सांग. "

" हे बघ, जमिनीत अर्धं मडकं पुरून त्याभोवती पाणी मारून मडक्यात अंडी ठेवली की टिकतात. सोप्पा उपाय आहे की नाही ? "

" तर ! मी आजच करून पाहतो."

पंकजसारख्या मुलाची आणि लक्ष्मणची मैत्री म्हणजे सगळ्या

शाळेत एक कुतूहलाचा विषय झाला होता. पंकज नेहमी लक्ष्मणला काही काही सांगायचा. लक्ष्मण घरी त्याचे प्रयोग करायचा. त्याला इतका उत्साह आला होता. पण एक दिवस – –

" लक्ष्मण... काय झालं रे ? असा रडवेला का दिसतोस ?" पंकजने मधल्या सुट्टीत त्याच्या खांद्यावर हात ठेवीत विचारलं. लक्ष्मण सुन्न होऊन एका झाडाखाली बसला होता. सुट्टीत सगळी मुलं चिवचिवत होती. पण हा एकटाच बसला होता.

पंकजने विचारल्याबरोबर लक्ष्मण रडायलाच लागला.

" पंकज...अरे माझ्या आठ कोंबड्या मेल्या रे काल ! आता माझी शाळा .."

" मेल्या ? अशा कशा ?"

" मानमोडीचा रोग आलाय रे गावात."

" म्हंजे ? तुम्ही कोंबडयांना देवी नव्हत्या टोचल्या ?" पंकजने आश्चर्याने विचारलं.

" देवी ? कोंबड्यांना ? पोरांना देखील नाही टोचवीत आमच्या गावातली माणसं. आता उरलेल्या दोन पण...."

" हे बघ, त्या दोन कोंबड्यांना अगदी बाजूला नेऊन ठेव आज गेल्या गेल्या. नाहीतर आत्ताच जा ना सरांना विचारून घरी. लागण झाली नसली तर अजूनही वाचतील. "

मास्तरांना लक्ष्मणची अडचण माहीत होती. शिवाय पंकजनेही भर घातली. लक्ष्मण धावत पळतच म्हटल्यासारखा घरी गेला.

●

पंधरा दिवस लोटले या गोष्टीला. एके दिवशी रविवार. शाळेला सुट्टीच होती. लक्ष्मण आपल्या खळ्यावर त्या उरलेल्या

दोन कोंबड्यांना दाणे टाकीत होता.तेवढ्यात त्याला दिसलं की...

पंकज, सतीश, वामन, मधू सगळी मुलं त्याच्याचकडे येत होती. त्यांच्या हातात काहीतरी होतं. सगळी आली आणि



लक्ष्मणच्या झोपडीसमोर मोकळी जागा होती तिथे थांबली. भरा-भरा त्यांनी कामाला सुरुवात केली.

"अरे हे काय करताय? ही लाकडं, या जाळ्या.." लक्ष्मणने विचारलं.

"केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे !" वामन एक फळी कापीत म्हणाला. सर्वांनी एकदम जयघोष केला, "श्री समर्थ रामदास स्वामी महाराज की जय !"

आता लक्ष्मणही त्यांच्यात सामील झाला. पंकज सांगत होता. मुलं काम करीत होती.

थोड्याच वेळात एक जाळीदार छोटंसं घर तयार झालं.

"हं ! लक्ष्मण हे तुझ्या कोंबड्यांसाठी घर. आणि या नव्या कोंबड्या..." असं म्हणत पंकजने एका माणसाच्या डोक्यावरून टोपलं उतरवलं. तो माणूस समोरून येताना लक्ष्मणने आत्ताच बघितला होता.

पंकजने ते जाळीदार घर एका कोपऱ्यात उभं केलं आणि त्या माणसाच्या टोपलीतल्या दहा सुंदर, धष्टपुष्ट कोंबड्या काढून त्या घरात ठेवल्या.

"अरे पण..." लक्ष्मणला मध्येच थांबवून सतीश म्हणाला, "अरे लक्ष्मण, आज तुझा वाढदिवस आहे ना? आमच्या सर्वांच्या लक्षात होतं. या पंकजनेच ही कल्पना काढली."

"हो आणि आम्ही सर्वांनी मिळून तुला ही वाढदिवसाची भेट द्यायची ठरवली." वामनने सांगितले.

"हे बघ लक्ष्मण, मी बाबांना सगळं सांगितलं तुझ्या कोंबड्यांबद्दल त्यांनीच आम्हाला ह्या लाकडी पट्ट्या आणि लोखंडी जाळी दिली. शिवाय हे घर कसं करायचं तेही शिकवलं."

"अरे लक्ष्मण, गेले पंधरा दिवस पंकजच्या डोक्यात हे घोळत

होते. तुझ्या कोंबड्या मेल्या ना तेव्हापासून. मग या बेतात आम्हीही सामील झालो."

"बरं का लक्ष्मण, पुढच्या रविवारी आमच्या पोल्ट्रीवर बाबांनी सर्वांना बोलावलंय. मळवलीच्या जवळ आहे. एक दिवसाची ट्रिप काढायची तिथे."

"हो आणि खायचा डबा न्यायला नको. ऑम्लेट, चिकनची आयतीच सोय !" मधू जिभल्या चाटीत म्हणाला.

लक्ष्मणला काय बोलावं तेच सुचेना. आपण सुरवातीला पंकज-बद्दल काय कल्पना करून घेतली आणि किती तोडून बोललो पहिल्या भेटीत, ते त्याला आठवलं आणि गळा भरून येत तो म्हणाला–

"पंकज ... मी ... मी ..."

"नो आभारप्रदर्शन ! हा मैत्रीचा मामला आहे. आणि बरं का लक्ष्मण, बाबा तुला कोंबड्यांबद्दल आणि इतरही खूप सांगणार आहेत. मी पण तेच शिकणार आहे ना ! "

आपल्याला मळवलीची ट्रिप मिळणार या आनंदात बाकीची होती आणि पोल्ट्री पाहण्याच्या आनंदाने आणि शिकण्याच्या उत्साहाने लक्ष्मण फुलून आला होता. जाळीदार घरात कोंबड्या फडफडाट, कलकलाट करीत होत्या. तेवढ्यात लक्ष्मणच्या आईने हाक मारली–

"चला रं समदी चटणी–भाकर खायला."

चटणी–भाकरीची पंगत बसली नि ती अशी काय रंगली आहे म्हणता !

✱ ✱

## सुखाचा शब्द बोलावा
## अनाथा साह्य ते द्यावे ।

---

"डागदरसाव...डागदरसाब..."

"काय आहे?"

"म्या दगडू!"

"आज का आलास पुन्हा? काल मी सांगितलं ना काय ते?"

"डागदरसाब, असं करू नगा वं! पोर तापानं लई फनफनलंय् योक डाव पगून औसीद द्या म्हनतू."

"हे बघ दगडू, आत्तापर्यंत मी औषध दिलं. पण या खेपेला मी येणार नाही नि औषधही देणार नाही. मागचं बिल आधी आणून दे."

"पन डागदरसाब..."

"ठाऊक आहे मला तू काय सांगणार ते. तुझं काम सुटलंय्. पोराच्या आजारपणामुळे बायको पण कामाला जात नाही. मालकीण तिचे खाडे धरील. ते पण पैसे नाहीत. हेच ना? मला सगळं पाठ आहे."

"डागदरसाव, तुमास्नी तर ठावंच हाय समदं. माला

काम लागलं की समदे पैसे फेडून टाकीन पन...आत्ताच्या बारी..."

"हे बघ दगडू.."

पण डॉक्टरांचं बोलणं पुरतं होण्याआधीच एकदम रस्त्यावर कसलातरी आरडाओरडा ऐकू आला. दोन-चार काचा फुटल्याचंही कळलं.

"डॉक्टरसाहेब..." कंपाऊंडर बाहेरून धापा टाकीत येत म्हणाला, "दंगा सुरू झालाय्!"

"दंगा? कसला? कुणाचा?

"त्या पलीकडच्या रस्त्यावरच्या रेशनवाल्याने गहू नि रॉकेल नाही म्हटलं म्हणून लोकं चिडली. त्यांनी दुकानात आतल्या बाजूला दडवलेली पोती बाहेर आणून लुटली."

"बाप रे!"

"शिवाय दगडफेक सुरू झालीय्. तेवढ्यात कुणीतरी हातबॉंब पण टाकला. दवाखाना बंद करा. पोलीस येताहेत."

दंग्याची गडबड ऐकून दगडू आधीच बाहेर पडला होता. आता तर डॉक्टर आपल्या पैरासाठी येतील ही त्याला आशाच नव्हती. याच्या मागच्या दंग्यात लोकांनी उगीचच त्यांच्या झोपड्यांचं नुकसान केलं होतं. एक-दोन तर जाळल्याच होत्या. म्हणून दगडू धावत घराकडे निघाला. रस्त्यात जिकडे तिकडे पोलीस होते. लाठीमार सुरू झाला होता. धावता धावता दगडूला कुणीतरी अडवलं आणि त्याला काही समजण्याच्या आत काही-तरी त्याच्या हातात ठेवलं आणि तो माणूस धावत सुटला.

"अहो अहो...हृचे माज्या हातात." असं म्हणून दगडू

त्याच्या मागे जाणार तोच तो माणूस गर्दीत दिसेनासा झाला. धावणाऱ्या दगडूला गर्दीत कुणीतरी धक्का दिला आणि त्याच्या हातातली वस्तू दूर उडून पडली.

"ठाँऽऽस..." एकदम मोठ्ठा आवाज झाला आणि भडका उडाला. शेजारच्याच दुकानाच्या एका फळीने पेट घेतला.

दगडूच्या हातातला हातबाँब त्याच्या हातातून उडाला तो नेमका त्या दुकानाच्या फळीवर आपटला. आपल्या हातात कुणी काय ठेवलं होतं याची त्याला कल्पनाही नव्हती. पण त्याच्या हातातून उडालेला बाँब काही जणांनी बघितला होता. त्यांनी त्याला पकडून ठेवला. तेवढ्यात पोलिस आलेच तिथे आणि दगडूला त्यांनी पोलिसांच्या हवाली केलं

"पोलिसदादा, म्यां कांईबी क्येलं न्हाई."

"अस्सं! मग बाँब काय आकाशातून पडला?"

"अवो मला काय बी ठावं नाय. गर्दीत कुनीतरी माज्या हातात कायतरी कोंबलं आन् कुनाचा तरी धका लागूनश्यान त्ये उडालं. माजा काय बी गुन्हा काय!" दगडू गयावया करून सांगत होता, पण पोलीस त्याचं ऐकायला तयार नव्हते. कारण त्याच्या हातातून बाँब उडालेला पाहणारे प्रत्यक्ष पुरावा देत होते ना?

बिच्चारा दगडू! त्याचा काही एक अपराध नसताना पकडला गेला. त्याला डोळ्यांसमोर दिसत होती त्याची वाट पाहणारी यशोदा नि त्याचा तापाने फणफणणारा पोरगा तो आर्तपणे पोलिसांना विनवीत होता. पण तो गरीब. दंग्यात कुणाला तरी पकडून, फुशारकी मारणार होता पोलीस. गरिबांचं ऐकणार कोण? त्यांची गांजणूक चालूच असते नेहमी.

इकडे यशोदा तीनतीनदा झोपडीच्या दारात येऊन दगडू आला का पाहात होती. पण दगडूच्या ऐवजी रस्त्यातली दगडूची अटक पाहणाऱ्या एका माणसाने पलीकडल्या झोपडीतल्या शेजाऱ्याने— घरी येऊन तिला सगळं सांगितलं आणि तिच्यावरच जणू बाँब टाकला ! एकुलता एक दगडूचा आधार होता तोही गेला. पोराला औषध मिळण्याची आशाही संपली.

•

" पाह्यलंत ? आज चौथा दिवस. अजूनही या यशोदेचा पत्ता नाही. चांगले खाडे धरल्याशिवाय वठणीवर नाही यायची."

यशोदेच्या मालकीणबाई गरजत होत्या. गेले चार दिवस यशोदा कामावर आली नव्हती. काम करावं लागल्याने मालकीणबाई संतापल्या होत्या. शिवाय यशोदा कळवायलाही आली नव्हती. त्यामुळे त्यांच्या रागात भरच पडली होती.

" अग पण काहीतरी अडचण असेल. उगीच का ती खाडा करून पैसे बुडवील ?" मालक जरा सहानुभूतीने म्हणाले.

" पण मी म्हणते, नवऱ्याला धाडायचं. त्याचं काम सुटलंय म्हणत होती. म्हणजे तो मोकळाच असणार."

" आई, तिच्या नवऱ्याचं काम सुटलं असलं तर तू तिचे खाडे नको धरू ग " उषा कळवळून म्हणाली

" हो, मोठी आलीय कळवळ्याची ! हे बघ उषे, तू नि समीर जाऊन बघून तरी या का नाही आली ते. म्हणावं, आज आली नाहीस तर उद्यापासून मी दुसरी बाई लावीन."

" अग पण आई – –"

" हे बघ समीर तू आता आणखी तिची बाजू घेऊ नकोस ती तिकडे मारुतीच्या देवळापलीकडे झोपडपट्टी आहे तिथे कुठेतरी राहते ती. जा, बघून या. "

उषा नि समीरला यशोदा फार आवडायची. कशी स्वच्छ नि टापटिपीची होती. तशी अशिक्षितच, पण कधी मुलं नि ती जराशी मोकळी असली की मुलांना गावाकडच्या काहीबाही गोष्टी सांगायची. अशा मजेशीर रंगवून सांगायची की मुलं ऐकताना गुंग होऊन जात असत. म्हणूनच तर त्यांना यशोदेची बाजू घ्यावीशी वाटली होती.

उषा नि समीर लगेच निघाली. तशी ती झोपडपट्टी फार दूर नव्हती. झोपडपट्टी मिळाली पण यशोदेची झोपडी नेमकी कुठली ?

" अहो, इथे यशोदा कोणत्या झोपडीत राहते ? " त्यांनी तिथल्याच एकाला विचारलं.

" कंची यशोदा ? " त्याने विडीचा झुरका घेत विचारलं.

" बाप रे ! इथे दोन यशोदा आहेत की काय ? " समीर म्हणाला.

" आणि आपल्या यशोदाचं आडनाव पण ठाऊक नाही आपल्याला ! " उषाने शंका काढली.

तो माणूस विडीपानात दंग झाला होता. पुढे बोलेलसं दिसत नव्हतं. मुलं तशीच पुढे निघाली. पाच-सहा झोपड्या टाकून कुणी दिसलं तर विचारावं, असं म्हणत होती तेवढ्यात दगडूची चौकशी करायाला गेलेला बबन्या आला का म्हणून दारात पाहायला आलेली यशोदाच त्यांना दिसली.

" यशोदा ! " दोघांनी एकदमच हाक मारली.

" उषाताई, समीरदादा, तुही कुट इकडे ? "

" आम्ही तुलाच शोधायला आलो होतो. "

" बाईसाबंनी धाडलं आसंल न्हवं ? " आणि यशोदाच्या डोळ्यांत टचकन पाणी आलं.



" घरामंदी तरी या. " असं म्हणून ती आत वळली. उषा नि समीरही तिच्या पाठोपाठ झोपडीत गेले.

" बाई ग ! आजारी कोण आहे ? " उषाने अंथरुणावर कुणी तरी झोपलेलं पाहून विचारलं.

" काय सांगावं उषाताय ! माजा शिरप्या लई बीमार हाये पाच-सहा दीस. "

" म्हणून तू कामावर आली नाहीस होय ? अग पण निदान दगडूला कळवायला तरी पाठवायचंस. आई इतकी चिडलीय्..."

उषा आणि समीरच्या या बोलण्याने यशोदा पुन्हा एकदा बावरली. आणि तिने दंग्यात दगडूला कसं निष्कारण पकडलं ते सांगून म्हणाली,

" त्ये बी घरात न्हाईत. सांगावा तरी धाडनार कुनावरूवर ? शिरप्याला टाकून म्या तरी कशी येनार ? शेजारी पाजारी भी कुनाला येळ न्हाई. याचा ताप बी औसद मिळाल्याबिगर... "

डॉक्टरांच्या औषधाशिवाय आणि त्यांनी येऊन तपासल्याशिवाय शिरप्याचा ताप निघणार कसा ? पण ती बोलता बोलता थांबली. या पोरांना उगीच कशाला सांगा ? असं वाटून ती गप्प बसली.

" बाईसावांना सांगा– म्हनावं ह्येचा ताप निगाल्यावरुबर येत्ये कामावर."

यशोदाचा निरोप घेऊन मुलं तिथून निघाली. यशोदानं न सांगताही त्यांना बरंच काही समजलं होतं. शिरप्याचा ताप निघाल्यावर यशोदा येणार पण तोपर्यंत आईच्या रागात तिचं काम राहणार नाही हे त्यांना ठाऊक होतं. आणि डॉक्टरांचं औषध मिळाल्याशिवाय शिरप्याचा ताप हटणार नाही हेही त्यांनी ओळखलं होतं.

दोघंही झोपडीतून बाहेर पडली ती गप्प गप्पच होती. काहीतरी विचार करीत होती. आणि अचानक उषा म्हणाली, "समीर, चल."

"अग पण कुठे ?"

"चल तर खरा," आणि उषाने त्याचा हात पकडला. उषा-बरोबर समीरही शिरला समोरच्याच त्यांच्या फॅमिली डॉक्टरांच्या दवाखान्यात.

"या. आज काय चिंचेने घसा धरला का आवळयाने खोकला झाला ?" डॉक्टरांनी विचारलं.

"डॉक्टरकाका...किनई..." उषा अडखळत म्हणाली.

"हं. बोल, बोल. थांबलीस का ?"

"डॉक्टरकाका, आज आम्ही दोघंही आजारी नाही आहोत." समीरने आता उषाचा बेत ओळखून म्हटलं.

"मग ?"

"डॉक्टरकाका, आमच्याबरोबर एक पेशंट बघायला चला." उषा म्हणाली.

"कोण रे ? तुमचा मित्रवित्र की काय ?"

"अं.. हो. छोटा मित्र." समीरने सांगितलं.

"कुठे राहतो ?"

"मारुतीच्या देवळापलीकडल्या झोपडपट्टीत."

"झोपडपट्टीत ? मग मी येणार नाही. अरे त्याचे आई-बाप - काय माझं बिल देणार आहेत ?" डॉक्टर म्हणाले आणि या दोघांकडे पाहू लागले.

" ते खरंय् डॉक्टरकाका, पण ..." आणि यशोदाच्या शिरप्याला डॉक्टरकाकांनी का तपासायला यावं ते मुलं त्यांना पटवून देऊ लागली. डॉक्टरकाका तसे अगदी घरचेच असल्यासारखे होते. त्यामुळे मुलांना मुळीच संकोच वाटला नाही.

" हे पाहा, सगळं कबूल. पण हे तुमचं आईजीच्या जिवावर बायजीचं उदारपण मला काही पसंत नाही. तुम्हाला तो मुलगा माझ्या औषधाने वरा व्हावासा वाटतं ना ? मग तुम्ही माझ्या पैशांची काही तरी व्यवस्था करा." असं म्हणून डॉक्टर त्यांच्याकडे रोखून पाहू लागले.

दोघंही मुलं विचारात पडली. मग एकदम समीर म्हणाला, " कबूल. पण नंतर दिले तर चालतील ना ?"

" हो. पोराचं औषध देणं संपून तो वरा झाला की मी बिल करीन. ते तुम्ही द्यायचं."

" हरकत नाही." दोघंही म्हणाली आणि डॉक्टरकाकांना यशोदेकडे घेऊन गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्या उठल्या दोघंही बाहेर जायच्या तयारीला लागलेली पाहून आईने विचारलं, " हे काय सकाळी कुठे निघालात ?"

" अग आई, काल आमच्या शाळेत वैद्यकीय तपासणी झाली. तेव्हा मुलांनी सकाळी मैल दोन मैल फिरायला जावं असं त्या डॉक्टरांनी सांगितलं. म्हणून आजपासून जाणार आहोत आम्ही." समीर म्हणाला

" वा: छान !" बाबा म्हणाले.

दोघंही बाहेर पडली. आणि अचानक मागे वळून उषा

म्हणाली, "आई, यशोदा आज कामावर येणार आहे हं ! दुसरी बाई ठेवू नकोस."

मुलं घरून बाहेर पडली ती थेट यशोदेच्या घरापाशी येऊन पोचली. काल रात्री अभ्यासाच्या वेळी दोघांनी खूप विचार केला होता. आणि एक बेत रचला होता.

"यशोदा, कसा आहे शिरप्या ?" आत आल्या आल्या उषाने विचारलं.

"अजुनी बरा न्हाई. पन डागदरांनी विंजेक्शन दिलंया. चार-सहा दिसांत आराम पडल म्हंत्यात."

"पडणारच. डॉक्टर फार हुषार आहेत." समीर म्हणाला.

"यशोदा, तू आता नीघ."

"आत्ता ग बया ! निघू ? आन् कुठं जाऊ ? " यशोदेने आश्चर्याने विचारलं.

"आमच्या घरी कामाला जा. तू आज कामावर येशील असं मी आईला सांगितलं आहे." उषा म्हणाली.

"पन शिरप्या..."

"हे बघ, शिरप्याजवळ आम्ही बसणार आहोत. त्याची औषधं काय द्यायची ते सांगून ठेव." समीर म्हणाला.

"पन .."

"आता पण नाही नि बीण नाही. लौकर जा आईचा राग व्हायच्या आत. आणि हे बघ, आम्ही इथे आलो आहोत, किंवा आम्ही डॉक्टरांना आणलं होतं, यातलं घरी काही सांगायचं नाही." उषाने बजावलं.

यशोदेला आश्चर्य वाटत होतं, विचित्र वाटत होतं. पण उषाने नि समीरने तिचं काही एक ऐकलं नाही. लौकर काम आटोपून तिने यायचं आणि यांना मोकळं करायचं हे ठरलं आणि यशोदा झपाझपा कामावर गेली.

" आई, कपडे इस्त्रीला न्यायचे आहेत ना ?" उषाने विचारलं शाळेतून आल्याबरोबर.

" हो. "

" दे. मी इस्त्रीला नेऊन आणते. " असं म्हणून उषाने कपडे भरले आणि ती बाहेर पडली.

" सुषमा..." उषाने आपल्या मैत्रिणीला दारातूनच हाक मारली.

" अरे, उषा तू ? आणि हे काय ?" तिच्या हातातल्या पिशवी-कडे पाहून सुषमाने विचारलं.

" सुषमा, तुला मी एक विनंती करायला आले आहे. तुझ्या भावाची लाँड्री आहे. तू कधीकधी कपड्यांना इस्त्री करतेस. "

" बरं मग ?"

" काही दिवस आमच्या कपड्यांना तू इस्त्री करून द्यायचीस. मी रोज संध्याकाळी कपडे घेऊन येईन. पण आईने दिलेले इस्त्रीचे पैसे मात्र तुला देणार नाही."

सुषमा बुचकळ्यात पडली होती. पण उषा तिची जीवश्च-कंठश्च मैत्रीण होती. त्यामुळे तिने काहीच शंकाकुशंका न काढता उषाचं म्हणणं कबूल केलं.

उषा नि समीर सकाळी नियमितपणे फिरायला जात होती.

एरव्ही ज्या कामाला कुरकुरत ते इस्त्रीचे कपडेही आपणहून आळीपाळीने इस्त्री करून आणीत होती. आईबाबा चांगलेच बुचकळ्यात पडले होते. कारण गेले पंधरा दिवस दोघांचं एकदाही भांडणसुद्धा झालं नव्हतं.

पंधरा दिवसांनी शिरप्या अगदी खडखडीत बरा झाला. तसा ताप साधाच होता. पण वेळेवर औषधपाणी झाल्यामुळे दुखणं वाढलं नाही. दगडूही निर्दोष सुटून कालच घरी आला होता.

" डॉक्टरकाका...समीर आणि उषा दवाखान्यात जाऊन हजर झाली.

" या. काय बरा झाला ना तुमचा छोटा मित्र ? " डॉक्टर हसून म्हणाले.

" हो ना. तुमच्या औषधानेच बरा झाला." उषा म्हणाली.

" डॉक्टरकाका...तुमचं बिल..." समीरने अडखळत विचारलं.

" हं, हे घ्या. " डॉक्टरांनी बिल पुढे केलं.

उषा–समीरने आपले खाऊचे, ट्रिपचे, इस्त्रीचे वाचवलेले असे सगळं पैसे डॉक्टरांच्यापुढे ठेवले. पहा दहा रुपये कमी पडत होते.

" डॉक्टरकाका..." उषा रडवेली झाली.

" काय ग ? दहा रुपये कमी पडताहेत का ? चला तुमच्या बाबांकडून वसूल करू या."

" नको...नको..." समीर एकदम म्हणाला, " आई–बाबांना यातलं काही ठाऊक नाही."

" अस्स ? मग तुमचे हे नसते धंदे त्यांच्या कानावर घातलेच पाहिजेत." डॉक्टर रागाने म्हणाले. नेहमी इतक्या प्रेमाने वागणारे डॉक्टरकाका आज असं का बोलताहेत ते मुलांना कळेना.

दोघंही डॉक्टरांच्याबरोबर खाली मान घालून घरात शिरली.

"काय ? आहेत का पोरांचे आईवडील घरात ?" आल्या आल्या डॉक्टरांनी आरोळी ठोकली.

"अरे...ये.. ये डॉक्टर" बाबा म्हणाले. डॉक्टरकाका त्यांचे वर्गमित्रच होते.

"या रे पोरानो...असे पुढे या !"

डॉक्टराचा जरबेचा आवाज आणि मुलाचे पडलेले चेहरे पाहून आई दचकलीच.

"काय झालं डॉक्टरभावोजी ? काय केलं पोरांनी ?" आईने विचारलं.

"ते मग सांगतो. आधी दहा रुपये द्या. पोरांनी चडवलंय मला."

डॉक्टर काय म्हणतात ते आईबाबांच्या लक्षात येईना. पण बाबा पटकन उठले आणि कोटाच्या खिशातून त्यांनी दहा रुपये काढून त्यांना दिले. डॉक्टरांनी आपल्या खिशातून मुलांनी दिलेले पैसे काढले, त्यांत ती दहा रुपयाची नोट घातली आणि म्हणाले, "मी ही दोन टॉनिकं लिहून देतो ती दुकानातून विकत घेऊन यशोदेला नेऊन द्या."

"यशोदेला ?" आईने गोंधळून विचारलं.

"हो, तिच्या पोराचा ताप बरा झाला, पण शक्तीसाठी ही टॉनिकं हवीत वहिनी, अहो आजारी पोराला घरी ठेऊन ही यशोदा तुमच्याकडे कामाला येत होती ती कुणाच्या जिवावर ? या – –"

डॉक्टरकाकांना मधेच अडवीत समीर म्हणाला, " पण डॉक्टर-काका -- "

" अरे, तुम्ही सांगितलं नाहीत पण मी संध्याकाळी जायची तेव्हा यशोदा मला सगळं सांगायची. तुमचं इस्त्रीचं रहस्यदेखील सुषमाच्या भावाने सांगितलं. "

" पण डॉक्टरकाका -- सुषमा तर -- " उषा रडवेली होत म्हणाली.

" अग, ती काही बोलली नाही. पण अशा गोष्टी मोठ्या माणसांपासून लपून राहतात होय ? " डॉक्टरांच्या आवाजात आता मात्र कौतुक होतं. आई-बाबा मात्र पार गोंधळून गेले होते. त्यांना कशाचाच उलगडा होत नव्हता.

पण डॉक्टरांनी सगळं स्पष्ट केलं.

" अरे, त्या यशोदेचं काम जाऊ नये म्हणून तुमची पोरं सकाळी तिच्या आजारी पोराजवळ बसत होती. मला आग्रहाने त्या पोराला औषध द्यायला लावलं. आणि माझं बिल द्यायचं म्हणून मैत्रिणीच्या लाँड्रीतून रोज कपड्यांना इस्त्री करून आणीत आणि ते पैसे साठवीत. त्यात खाऊचे नि ट्रिपचे पैसे घालून त्यांनी आज माझं बिल चुकतं केलं. दहा रुपये कमी पडले म्हणून केविलवाणी झाली होती पोरं. त्यांना काय वाटलं मी बिल त्यांच्याकडून वसूल करणार होतो ? पण आपणहून उचललेली आपली जबाबदारी आपणच पार पाडायची असते हे मला शिकवायचं होतं त्यांना. "

" पण त्यांनी हे आम्हाला का नाही सांगितलं ? "

" मला तरी कुठे सांगितलं ? तुम्ही तर चक्क रागवाल ही

भीती वाटली त्यांना. पण फार चांगली गुणी मुलं आहेत रे दोघ-जण. वहिनी, तुम्ही नुसतं यशोदा का येत नाही म्हणून बघायला पाठवलंत आणि पोरांनी बघा कुठल्या जाणिवेनं हे सगळं केलं. देशाचं भवितव्य काय ? असं म्हणणारांना म्हणावं या पोरांकडे बघा. सगळ्या पोरांमधे ही अशी जाण निर्माण करा. मग बघा देश कसा होईल तो. काय रे पोरांनो -- खरं की नाही ? "

पण डॉक्टराच्या प्रश्नाला उत्तर द्यायला मुलं होतीच कुठे तिथे ? ती केव्हाच औषधाच्या दुकानाच्या वाटेला लागली होती. पाठमोऱ्या दोघांकडे बघतांना आपण यशोदेचे खाडे कापणार होतो या विचाराची आईला लाज वाटली. आणि बाबांनी ठरवलं, की मुलांचे ट्रिपचे पैसे परस्पर शाळेत नेऊन भरायचे आणि ती परत येईतो भरपूर खाऊ घरी आणून ठेवायचा !

## जयाला धर्म तो प्यारा
## तयाने प्रेममय व्हावे ।

"ए प्रताप, हरिश्चंद्रगड चढायला फार कठीण आहे का रे?"

"फार कठीण आहे असं नाही, पण..."

"म्हंजे सोपा आहे असंही नव्हे. हो ना ?"

"का ? फे फे व्हायला लागली का आत्ताच ? अहो शूर मावळे वीर, आपण अजून एस. टी.न आहोत. अजून खुबी आलेली नाही."

"खुबी ?"

"तू मोठ्या खुबीने आम्हाला चकवतोस नि . एकटाच सिनेमाला जातोस ती खुबी नव्हे. आपण हरिश्चंद्रगडावर जाण्यासाठी ज्या गावापाशी एस. टी. ने उतरणार आहो त्या गावाचं नाव आहे खुबी "

मुलामुलींचं एक टोळकं ट्रेकला निघालं होतं. एस. टी. ने पुणे–नाशिक रस्त्यावरच्या आळेफाट्याकडे ते चालले होते. या फाट्यापासून अणे–माळशेज घाटाकडे जाणाऱ्या रस्त्यावर हे खुबी गाव आहे. खुबीच्या फाट्यापासून चालायला लागलं की हरिश्चंद्रगडाचा पायथा पाच किलोमीटरवर सुरू होतो. सगळी

माहिती काढून आणि एकदा हरिश्चंद्रगडावर जाऊन आलेल्या प्रतापला बरोबर घेऊन हे टोळकं चाललं होतं. प्रताप सर्वांपेक्षा मोठा होता.

"बाकी काही म्हणा, उभ्या महाराष्ट्रात हरिश्चंद्रगडाइतकी सुंदर जागा नाही." प्रताप म्हणाला.

"खरं ?" प्रदीपने विचारलं.

"मग काय खोटं म्हणतो ? मी एकदाच गेलो पण पुन्हा केव्हा जातो असं सारखं मनात येत होतं इतके दिवस."

"सगळं सामान घेतलं ना रे आपण ?" सुभाषला मध्येच आठवण झाली.

"तर ! यादीप्रमाणे सगळं घेतलंय् मैंने तो कुछ भी नहीं बाकी छोडा उकडलेली अंडी, बाजरीच्या भाकऱ्या, कांदे, बटाटे, जॅम, लोणची, सूपची पाकिटं..." मन्सूर म्हणाला

"वा: वा: ! जशी काही जेवणासाठीच ट्रिप काढल्यासारखं सांगतो आहेस, मन्या !" विशाखाने चिडवलं.

"आणि आपण काही सैंपाक-बियंपाक करणार नाही रे बाबा. हो, नाहीतर मुली म्हणून माझ्या नि विशाखाच्या गळ्यात ते काम टाकून तुम्ही जाल गड चढायला." रोझा म्हणाली.

"स्त्री मुक्ती की जय !" मुकुंदाने चिडवलं.

गप्पा रंगल्या होत्या एस. टी. धावत होती आसपासचे उतारूही या घोळक्याकडे जरा कुतूहलाने व कौतुकाने पाहात होते.

एस. टी. खुबी गावात थांबली. मुलांनी आपापल्या पिशव्या खांद्याला अडकवल्या आणि उतरून चालायला सुरुवात केली.

भराभर पायथा गाठायचा होता. त्यामुळे एखादा मूक मोर्चा असावा तशी मुलं मुकाट्याने चालली होती. पायथा दिसायला लागला आणि सर्वांची कळी खुलली. खांद्यावरच्या पिशव्या उतरवून पायथ्याशी पाचेक मिनिटं त्यांनी थांबायचं ठरवलं.

" या अल्ला !" मन्सूर एकदम उद्गारला.

" काय रे ? काय झालं ?" प्रदीपने विचारलं.

" अरे डावीकडे बघ. तो किल्ला कोणता ?"

" तीच हरिश्चंद्रगडाची डावी बाजू. आणि इथूनच आपल्याला चढायचं आहे." प्रतापने सांगितलं.

" केवढा काळाकभिन्न कातळ आहे !" विशाखा म्हणाली.

" एकादा काळाकुट्ट राक्षस वाटतो, नाही परीकथेतला ?"

" का ? रोझाबाई ? अजून परीकथा विसरल्या नाहीत वाटतं ?"

"त्या विसरणार नाहीतच. आणि प्रदीप, या काळ्या राक्षसाला या दोन्ही राजकन्या भिणार नाहीत. सरळ त्याच्यावर चाल करून जाणार आहेत."

" च्...च्.. एक चांगली संधी हुकली." मन्सूर चुकचुकला.

" कसली ?"

" अरे, राक्षसाच्या हातून राजकन्यांना सोडवायची !" मन्सूर हसत हसत म्हणाला.

आत्तापर्यंतच्या चालीचा शीण या गप्पाटप्पांत ओसरला. सर्वांनी तो काळा कातळ चढायला सुरुवात केली.

" कित्ती खडबडीत वाट आहे, नाही ?"

“ पण वाट असेल असं तरी खालून वाटलं होतं का ?”

“ दगडधोंडे मुबलक आहेत. पण तांबडी मातीही आहे.”

“ आपण पहिल्यांदा कुठे जाणार आहोत, प्रताप ?”

“ टोलार खिडीकडे. दोन डोंगरांच्या बेळक्यात गर्द झाडीने वेढलेली ही टोलार खिड. कसं थंड आहे, नाही ?”

“ हो. पण तहान लागलीय्. मन्या जरा पाण्याची पिशवी दे.”

आणि मन्सूर पिशवी देणार तेवढ्यात प्रतापने ती ओढून घेतली.

“ हे पाहा–पाणी प्यायचं नाही.”

“ पण तहान...”

“ तहानेसाठी ही लिंबं आहेत. मी एकेकाला फोड कापून देतो. ती चघळा.”

लिंबाच्या फोडी चघळीत मुलं जवळजवळ तासभर चढत होती. आत्तापर्यंतची वाट वळणावळणाची. झाडीतून त्यामुळे पन्नास फुटांपुढे काहीच दिसत नव्हतं. पण आता मात्र एकदम समोर उभा राहिला एक अरुंद कातळ. डावीकडे घसरगुंडी. उजवीकडे उंच डोंगर. एकेकजणच पुढे जाऊ शकेल अशी वाट.

आता कुणी बोलणं शक्यच नव्हतं. त्या कातळाच्या दर्शनानेच मुलांची मनं हाबकली होती.

‘ बघा, हा कातळ आहे जवळजवळ पन्नास फूट तो ओलांडून जायचं तर आपली गिर्यारोहणाची सगळी करामत पणाला लावून. नाहीतर मग दुसरीकडून वाट आहे. पण ती फार लांबून आहे. बोला, कोणत्या वाटेने जायचं ?”

“ कातळ ओलांडून.” रोझा नि विशाखा एकदम म्हणाल्या.

"वरोबर ! कमरत करून जायचं नाही तर गडावर चढायचंच कशाला ?" प्रदीपने त्यांचीच री ओढली.

आणि सर्वांनी जपून पावलं टाकीत, इकडे तिकडे कुठेही लक्ष न जाऊ देता कातळ ओलांडायला सुरुवात केली. मन्सूर तसा आज प्रथमच येत होता त्यामुळे प्रदीपने त्याचा हात धरला होता. प्रताप सर्वांच्या शेवटी राहिला होता. विशाखा आणि



रोझा मध्ये होत्या. अर्धाअधिक कातळ ओलांडून झाला आणि एकदम...

" घसरतोय . मी घसरतोय .." सुभाषचं ओरडणं कानावर आलं. सगळी चढता चढता जागच्या जागी थबकली.

प्रताप एकदम बराच मागे आपणहून घसरला. पण त्याने तेवढ्यात सर्वांना ओरडून सांगितलं–

" मागे न बघता तुम्ही सरळ चालत राहा."

मागे बघता येत नव्हतं पाऊल पुढे पडत होतं. पण घसरणारा सुभाष आणि प्रताप यांच्याकडेच प्रत्येकाचं मन लागलं होतं.

प्रताप मागे मागे सावधपणे घसरत खालच्या बाजूला गेला होता. सुभाष स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करीत होता, पण ते त्याला जमत नव्हतं पण प्रतापचं त्याच्याकडे पूर्ण लक्ष होत. तो घसरत येत होता आणि प्रताप एका जागी स्थिर होता. सुभाष त्याच्या अगदी जवळ आल्याबरोबर प्रतापने गुडघ्यांवर बैठक मारून दोन्ही हातांनी त्याला अडवलं. सुभाष घसरायचा थांबला, पण निपचित पडून राहिला. प्रतापने पाचेक मिनिटं त्याचे हात डोक्याकडे नेऊन हालवले. आता सुभाष हळूहळू श्वास घेऊ लागला. प्रतापने त्याला बसता केला. तो पुन्हा थोडा वेळ थांबला. मग मात्र सुभाषला हात धरून उठवीत म्हणाला, " चल माझा हात धरून."

आणि पुढे जाणाऱ्या मुलांना दिलासा देण्याकरता त्याने ओरडून सांगितलं–

" मी आणि सुभाष अगदी सुखरूप येत आहोत एकमेकांचा हात धरून."

आणि ते ऐकून पुढे जाणाऱ्या सर्वांच्याच जिवात जीव आला. त्यांनी हरिश्चंद्रगडावर जायचं ठरवलं तेव्हा सुभाषच्या घरी झालेला विरोध त्यांना आठवला. त्याची आई म्हणाली होती—

" अरे पण काही नडलंय का त्या कठीण डोंगरावर जायचं ? एकेक वाचतो आपण पेपरात. कुठे पाय बीय घसरला म्हंजे ? "

पण विशाखानेच सभाषच्या आईची खूप समजूत घालून त्याला आणला होता. ती म्हणाली होती, " आई, तुम्ही काही काळजी करू नका. आम्ही सगळी आहोत ना ! शिवाय सुभाष तसा एक-दोनदा आलेला आहे गड चढायला. "

" अग पण ते गड सोपे होते. शिवाय तो आहे धांदरट. त्याचं लक्ष नेहमी कुठेतरी भरकटत असतं. बघेल एकीकडे आणि – –."

प्रतापने सांगितलं तेव्हा विशाखाला हे सगळं आठवलं. सुभाष कातळ चढत होता तेव्हा वरून एक घार उडत गेली. दरीत कोसळलेल्या प्राण्यांवर ताव मारायला घारी येतातच. पण हे सांगितलेलं लक्षात न राहून त्याने घारीकडे पाहिलं आणि – –

नंतर मात्र त्यांनी काहीही अडचण न येता कातळ ओलांडला.

" अरे, ते बघ पाणी – – " कातळ ओलांडला, खिंड लागली आणि तहानलेल्या सुभाषने एकदम पाण्याच्या टाकीकडे झेप घेतली.

" आता खिंडीत थोडा वेळ आपण थांबायचं. पोटपूजा करायची आणि गड चढायला लागायचं. " प्रतापने अनुभवी सल्ला दिला.

पिशव्या खांद्यांवरून उतरून उघडल्या गेल्या.

" ए, मी इन्स्टंट पिठलं करते. " विशाखा म्हणाली.

" म्हंजे ? "

" ही आमच्या चारुदादाची स्पेशालिटी. कांदा, बेसन भाजून घ्यायचं एका प्लास्टिकच्या पिशवीत आणि अस्सं या उकळत्या पाण्यात टाकायचं, की झालं पिठलं तयार. "

विशाखाने तीन दगडांच्या चुलीवर उकळत ठेवलेल्या पाण्याच्या भांड्यात पिशवीतलं पीठ ओतलं.

त्या पिठल्याची आणि इतर पदार्थांची चव आज त्यांना काही वेगळीच लागली.

थोडी विश्रांती घेऊन सगळी पुढे निघाली. आता हरिश्चंद्रगड सर करायची त्यांना उत्सुकता लागली होती.

काळ्या पत्थरातून काढलेला हा सुमारे तासाभराचा रस्ता. सरळसोट दगडांमधून कित्येक वर्षांपासून येणाऱ्या प्रवाशांनी खोवणी करून ठेवलेल्या. आधारासाठी एक पाऊल किंवा हाताचा पंजा या खोबणीत रोवायचा आणि चढत चढत ज यचं.

" या खोबणी आहेत म्हणून बरं. नाहीतर आपण कसे चढलो असतो ? "

" हो ना. नुसतं खडकांवरून का उड्या मारीत..."

असं म्हणणाऱ्या विशाखाचं वाक्य पुरं होण्यापूर्वीच त्यांना पाच सहा काळ्या कुळकुळीत काटकोळ्या शरीराची माणसं झपाझप अक्षरश: डोंगरावरून उड्या मारीत असल्यासारखी चढून वर गेलेली दिसली.

या माणसाकडे मुलं आश्चर्याने डोळं फाडून पाहात होती.

"एकादी टोळधाड यावी तसं वाटलं एकदम." रोझा म्हणाली·

" अक्षरश: टोळांसारखी उड्या मारीत चढली ती माणसं."

" कोण असावीत रे प्रताप ?"

" ही कातकरी मंडळी. वरच्या पठारावरचं लांब लांब सुकलेलं गवत आपल्या झोपड्या शाकारण्यासाठी घेऊन जातात हे लोक. मी मागच्या वेळी विचारलं होते "

" रोज असे चढतात ?"

" अग विशाखा, त्यांना सवय असते. आपण आता मारे गिर्यारोहण म्हणतो. पण शिवाजीमहाराजांचे मावळे नाही का भराभर किल्ले चढत असत ? केव्हा पायथ्याशी होते नि केव्हा वर चढून किल्ल्यावर दिसेनासे होत, ते चोळणा सावरीत हत्तीसारखे धपाधप चालत येणाऱ्या मोगलांना कळायत देखील नसे. ! "

प्रदीपने वर्णन केलेलं अगदी प्रत्यक्ष नजरेसमोर उभं राहिल्यासारखं वाटलं सर्वांना.

" हो. किल्ले चढायला मोगल अगदी नालायक. आमचे अब्बाजान नेहमी सांगतात जुन्या गोष्टी." मन्सूर म्हणाला.

खडकातली वाट संपून सगळी माथ्यावर चढली.

" ते बघ." प्रतापने सुभाषला म्हटलं.

" समोर काळाकभिन्न कडा, मागे प्रचंड दरी आणि खाली हिरवी झाडी. काय छान दिसतंय ! "

" पण तितकंच छाती दडपणारं देखील ! "

" अरे सुभाष, मी तुला हे नाही बघ म्हटलं. मी म्हटलं त्या घारी बघ आता. आपण त्यांच्यापेक्षा उंच आहोत. खालच्या दरीवरून उडताहेत त्या. मघाशी त्यांच्याकडे पाहताना घसरलास ना, तर आता .."

प्रतापला अडवून रोझा म्हणाली,

"आता त्यांच्याकडे बघताना आपणच उडतो आहोतसं वाटतं. त्यांना उडताना दिसत असेल तशीच जमीन आपल्याला दिसते आहे, नाही इथून ?"

"चला, आता देवळाकडे जायचं." प्रतापच्या सांगण्याबरहुकूम मुलं चालली होती. तीन टेकड्यांमधल्या दोन घळी पार करून मुलं देवळाजवळ पोचली. संपूर्ण काळ्या दगडाचं हे देऊळ पाहून मुलं थक्क झाली. दोन नैसर्गिक खडकांच्या भिंती, मध्यभागी देऊळ, त्यात देव्हारा, पलीकडे दगडाचा प्रचंड नंदी. सभोवार खडकातून कोरून काढलेल्या गुहा. पाण्याची दोन स्वच्छ टाकी.

मुलं देवळात थोडी विसावली. थोडं खाणं-पिणं केलं आणि परत निघाली तेव्हा सूर्य मध्यावरून थोडा कलता झाला होता. अंधार पडायच्या आत परत जायचं होतं.

आता खांद्यावरची ओझी हलकी झाली होती. देवळातल्या शांततेने आणि गंभीरपणाने मुलांची मनं भारावून गेली होती. माथ्यावरून निघून भराभर चालत त्यांनी तो पूर्वीचा कातळ गाठला. चढताना दरीकडे पाठ होती. उतरताना ती समोर सर्वांना पिळून टाकायला उभी राहिलेल्या राक्षशिणीसारखी भासली !

"दरीकडे न बघता पायांखाली बघून उतरा." प्रतापने सांगितलं.

अर्धाअधिक कातळ उतरून झाला आणि अचानक जोराचा वारा सुटला. पार अंधारून आलं. समोर काही दिसेना वादळी वाऱ्याच्या झोताने वरच्यावर आपण उडून जातो की काय अशी भीती वाटू लागली.

" वळवाचा पाऊस गाठतो की काय आपल्याला आजच ?"

" आणखी आठ दिवस तरी वळीव येणार नाही असं बाबा म्हणाले होते."

" अगाई गऽऽ ओ, माय गॉड ! " रोशनी किंकाळी ऐकून सगळे जागच्या जागी थबकले. वाऱ्याच्या झोताबरोबर डोळ्यांत काहीतरी जाऊन तिला एकदम दिसेनासं झालं होतं.

तसं आता अंधारामुळे कुणालाच दिसत नव्हतं. रात्र आहे की दिवस, कातळ सरळ आहे की वाकडा, आपण मधोमध आहो की दरीच्या टोकावर, काही काहीच कळत नव्हतं.

" हे पाहा, काहोही दिसत नाही. पुढे जाणं धोक्याचं आहे. हे मळभ आणि वादळ जाईपर्यंत जागच्या जागी बसून राहा." प्रताप म्हणाला.

" किती वेळ लागेल रे ?"

" काय सांगणार ? कदाचित रात्रभर इथेच राहावं लागेल."

" रात्रभर ?"

" मग काय करणार ? समजा, आणखी तासभर वादळ चाललं नि अंधारी राहिली तर रात्रच होईल तोवर. मग कातळ उतरायला कसं दिसणार ? त्यापेक्षा आहोत तिथेच बसणं जास्त सुरक्षित."

मधूनच एकदम वीज चमकली तेव्हा सर्वजणं एकमेकांच्या जवळ येऊन बसली.

भोवताली काळाकुट्ट अंधार आणि वादळाचं घोंघावणं. मुलं अगदी नि:शब्द होती. सर्वांनी हात जोडले आणि स्तब्ध जागच्या जागी बसून राहिली.

थकव्यामुळे आणि भीतीमुळे असेल, मुलांना बसल्या जागीच झोपा लागल्या. सर्वांत प्रथम जाग आली ती मन्सूरला.

" या अल्ला ! सुबह् हो गयी ! " तो अचानक म्हणाला.

लांववर क्षितिज दिसत होते. रात्रीचा आणि पावसाचा अंधार ओसरून सूर्य हळूहळू वर येत होता. प्रकाश एकदम म्हणाला–

" ही शांतता आणि हा प्रकाश. मला वेडं करतातही. सगळा निसर्गच मला मोहून टाकतो. ईश्वराचं हे कोडं मला नेहमी त्याच्यापुढे नम्र व्हायला लावतं."

" येशूनेच आपल्याला कालच्या संकटातून वाचवलं. " रोझा म्हणाली.

" हो ना. मी पण अल्लाला प्रार्थना करून वाचवायला सांगितलं आपल्याला. " मन्सूरने सांगितलं.

" मी देखील सारखा 'बुद्धं सरणं गच्छामी' म्हणत होतो " प्रदीपने आपला अनुभव सांगितला.

" मी तर मनोमन इतक्यांदा पांडुरंगाची आळवणी केली ! " विशाखा सांगत होती.

इतकी बाकीची बोलत होती, पण प्रताप गप्प होता. सगळ्यांना आश्चर्य वाटलं. मन्सूर म्हणाला, " प्रताप, तुम चूप क्यों हो ? तुला नाही वाटत आम्ही प्रार्थना केल्या म्हणून आपण वाचलो ? "

" हे पाहा, मी गप्प अशासाठी होतो की तुमच्या कुणाच्या प्रार्थनेने आपण वाचलो याचा विचार करीत होतो. कोणत्या देवाने वाचवलं वरं आपल्याला ? मन्सूरच्या अल्लाने, रोझाच्या येशूने, विशाखाच्या पांडुरंगाने की प्रदीपच्या गौतम बुद्धाने ? "

आणि प्रताप सर्वांकडे पाहू लागला. तो काय म्हणतो आहे ते त्यांना शब्द समजले पण त्याचा रोख काय तो उमगेना.

" तू कुणाची प्रार्थना केलीस रे ?" विशाखाने विचारलं.

" मी ना ? मी त्या काळ्याकुट्ट अंधाराकडे काही क्षण पाहून घेतलं. मग डोळे मिटले आणि म्हटलं, ' हे जगन्नियंत्या, परमेश्वरा, हे आकाश तुझं, हे डोंगर तुझे, या दऱ्या-घळी तुझ्या, हा कातळ तुझा, हे वादळ तुझं, प्रकाश तुझा नि अंधार तुझा, झाडंझुडपं तुझी नि नदीनाले, समुद्र तुझे. तशीच आम्ही ही सगळी मुलंही तुझीच, नाही का ? तू बाकी निसर्गावर जसं प्रेम करतोस तसंच आमच्या सर्वांच्यावरही करतोस ना ? मग या तुझ्या सगळ्या बाळांना या संकटापासून वाचव. आम्हाला सुरक्षित ठेव ! ' "

प्रताप एवढं म्हणाला आणि त्याने डोंगराआडून वर येणाऱ्या उगवत्या सूर्याला हात जोडले बाकी मुलांनीही हात जोडले. ती सगळी त्या जीवनदात्याची मनोमन प्रार्थना करीत होती. त्याचा प्रकाश हळूहळू त्यांच्या अंगोपांगी चढत होता आणि मनातही प्रवेश करीत होता.

BVBK-0402479

भा. रा. भागवत यां

कुमार जगाचा लाडका

# फास्टर



* फुरसुंगीचा फास्टर फेणे
* आगे बढो फास्टर फेणे
* बालबहादूर फास्टर फेणे
* जवान मर्द फास्टर फेणे
* फास्टर फेणेचा रणरंग
* ट्रिंग....ट्रिंग फास्टर फेणे
* फास्टर फेणेची काश्मिरी करामत
* फास्टर फेणेची एक्सप्रेस कामगिरी
* फास्टर फेणे टोला हाणतो
* प्रतापगडावर फास्टर फेणे
* गुलमर्गचे गूढ आणि फास्टर फेणे
* फास्टर फेणे डिटेक्टिव्ह

| | |
|---|---|
| * फास्टर फेणेच्या गळ्यात माळ | १० |
| * सन्नी वादळात फास्टर फेणे | १० |
| * चिकू चिंपान्झी आणि फास्टर फेणे | १० |
| * चिकूचे चाळे आणि फास्टर फेणे | १० |
| * फास्टर फेणेची डोंगरभेट | १० |

आणि आगामी टप्पे

* जंगलपटात फास्टर फेणे
* टिक टॉक फास्टर फेणे

उत्कर्ष प्रकाशन

कव्हर छपाई : जंगम कलामुद्रा